# बेशिस्त सरकारीबाबूंना शिस्त लावणार कोण?

## राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) नामदेव कोतवाल यांचा सवाल

**सिन्नर ।** शासकीय कार्यालयात विविध कामानिमित्त आलेल्या नागरीकांना तासन् तास ताटकळत उभे रहावे लागते. कार्यालयीन वेळेत तालुक्यातील शासनाच्या अनेक कार्यालयांत अधिकारी कर्मचारी गैरहजर रहातात. पर्यायाने नागरिकांना ताटकळत उभे रहावे लागते. या बोकाळलेल्या बेशिस्तीला शिस्त कोण लावणार? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे माजी शहराध्यक्ष नामदेव कोतवाल यांनी केला आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागातील असो की शहरांतील नागरिकांना कुठल्या ना कुठल्या कामासाठी शासकीय कार्यालयात जावे लागते; परंतु संबंधित कर्मचारी व अधिकारी जागेवर सापडत नाही.ही बाब नित्याचीच बनली आहे. शासनाने दुपारची वेळ ही अर्धा तास जेवणासाठी निश्चित केलेली आहे. प्रत्यक्षात जेवणानंतर दीड-दोन तास कर्मचारी गायब होतात तर काही कर्मचारी चहाच्या गाडीवर व पानटपरी, हॉटेलवर व इतरत्र चकाट्या मारताना दिसतात. ग्रामीण भागातील २५/ ३० किलोमीटरवर वरून येणारा सामान्य शेतकरी शासकीय कार्यालयात आपले काम वेळेवर होण्यासाठी साठी वेळेत पोहोचतो; पण थोडा जरी त्याला पोहोचण्यास दुपारी उशीर



झाला तर त्याला लंच टाईमचा जबर फटका बसतो आणि तासनतास संबंधित टेबलवर सरकारी बाबुच्या प्रतिक्षेत रहावे लागते . तसेच काही स्थानिक कर्मचारी दुपारी जेवणासाठी घरी जातात. त्यात दुपारी घरी जाण्यासाठी बायोमेट्रिकची अडचण नसल्याने रामभरोसे पध्दतीने कार्यालयात येतात. हे कुठेतरी थांबले पाहिजे. पर्यायाने जवळपास सर्वच शासकीय कार्यालयात येण्या जाण्याचा वेळा पाळल्या जात नाही व कार्यालयात वेळापत्रकाचा अभाव दिसून येतो. तालुका पंचायत समिती व भूमी अभिलेख कार्यालयात तर प्रचंड अनागोंदी आहे. संबंधित खात्यातील विभागप्रमुखांचे दुर्लक्ष असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर आहे. ठेकेदारांच्या गर्दीत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सामान्य नागरिकांना त्यांच्या समस्या व गा-हाणीसाठी भेटणेही मुश्किल बनले आहे. भेटले तर धड बोलत नाही व फक्त टोलवाटोलवी व थातुरमातुर उत्तराचा अनुभव येतो. असा अनुभव रोजच तालुक्यातील नागरिकांना येत आहे. "साहेब आत्ताच बाहेर गेले" "नाशिकला मिटींगला गेले आहे. दुपारपर्यंत येतील. जरा वेळाने येतील; परंतु जरा वेळ म्हणजे दिवसभर बेपत्ता! असे समीकरण तयार झाले. अशा कामचुकार व बेशिस्त दांडी बहाद्दर अधिकारी व कर्मचाऱ्यांना आळा घालण्याची गरज आहे. हा आळा घालणार कोण? असा सवाल कोतवाल यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात विचारला आहे.

# समीर भुजबळ यांच्याकडून महात्मा फुले यांना अभिवादन



**नाशिक ।** क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने पूर्वसंध्येला माजी खासदार समीर भुजबळ यांनी फुले स्मारक मुंबई नाका येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत विनम्र अभिवादन केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.रवींद्र पगार, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब कर्डक, प्रदेश चिटणीस समाधान जेजुरकर, समितीचे अध्यक्ष अंबादास खैरे, शहराध्यक्षा कविता कर्डक, प्रसाद सोनवणे, अमोल नाईक, आशा भंदूरे, दीपा कमोद,संदीप खैरे, तेजश्री काठे, शंकर मोकळ, नाशिक महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, अमर वझरे, आकाश पगार, नाना साबळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. जयंतीच्या निमित्ताने महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने फुले स्मारक मुंबई नाका परिसरात फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे.

# सांगा जगायचं तरी कसं...?

## एसटी कर्मचाऱ्यांकडून उपस्थित होतोय प्रश्न!

**(भैयासाहेब कटारे यांजकडून)**

**नाशिक ।** "गाव तिथे रस्ता, रस्ता तिथे एसटी" हे ब्रीदवाक्य खरीखुरी जीवनरेषा असलेल्या लालपरीचं सार सांगतं. महाराष्ट्रातील दूरदूरच्या खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचणाऱ्या एसटी महामंडळाची सेवा म्हणजे गरिबांचे पाय असतात;परंतु या सेवेचा आधारस्तंभ असलेल्या कर्मचाऱ्यांची अवस्था



आज अत्यंत हालाखीची झाली आहे. त्यामुळे त्यांच्या मनात नाना प्रश्न रुंजी घालत आहेत. नुकतीच राज्य शासनाने मार्च महिन्याचा केवळ 56 टक्के पगार देण्याची घोषणा केली. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये संतापाचीग लाट उसळली आहे. सरकारकडे आमदार, खासदारांचे पगार वाढवण्यासाठी, त्यांच्या निवृत्ती वेतनात वाढ करण्यासाठी निधी असतो. लाडक्या बहिणींच्या योजनेवर कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, मग एसटीसारख्या महत्त्वाच्या सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी निधी का नाही? एवढ्या महागाईत किराणा, मुलांचे शिक्षण, घरभाडे या सर्व खर्चांच्या पार्श्वभूमीवर 56 टक्के पगार कसा पुरावा? "सांगा, जगायचं कसं?"—असा हतबल सवाल आता हे कर्मचारी करत आहेत. दिवसाचा उष्मा, रात्रीची थंडी, नादुरुस्त बसेस, तुटलेल्या खिडक्या, फाटकी सिट्स तरीही कंडक्टर आणि ड्रायव्हर जीव धोक्यात घालून प्रवाशांना सुरक्षित पोहोचवतात. वेळेवर वेतन न मिळणं, कामाच्या ठिकाणी असुविधा, तरीही प्रामाणिक सेवा – हेच आजच्या एसटी कर्मचाऱ्यांचं वास्तव आहे. एसटी ही केवळ एक बस सेवा नाही, ती ग्रामीण महाराष्ट्राचा कणा आहे. विद्यार्थ्यां पासून ते शेतकऱ्यां पर्यंत, सामान्य माणसाला स्वस्तात प्रवास करून देणारी ही सेवा आज दुर्लक्षित का? मागील संपात काहींना जीव गमवावा लागला. आंदोलन केल्या नंतरच सरकारला जाग आली, या वरून सरकारच्या संवेदनशीलतेचा अंदाज येतो. जोखीम घेणाऱ्या नोकऱ्यांना कमी वेतन, आणि सुरक्षित नोकऱ्यांना भरघोस पगार – ही नीतिमत्तेची चूक नाही का? जर सरकार फुकट योजना थांबवून, तोच निधी एसटी महामंडळाच्या सुधारणेसाठी वापरू लागलं, तर या लालपरीला नक्कीच नवसंजीवनी मिळेल. एसटी कर्मचाऱ्यांचा एकच सवाल – "आम्ही इमानेइतबारे सेवा देतो, मग आमच्या जिवनाचा विचार सरकार कधी करणार?" हे सरकार कडून विचारलेला एक जिवंत प्रश्न आहे – ज्याचे उत्तर समाजाने आणि शासनाने देणे आवश्यक आहे.

## महत्त्वाचे

### वसंत व्याख्यानमाला नाशिकचे वैभव-श्रीकांत बेणी

**नाशिक ।** विचारवंतांनी मांडलेले विचार माणसाला नेहमी समृद्ध करत असतात. असे विचार पेरणारी वसंत व्याख्यानमाला हे नाशिकचे




सांस्कृतिक वैभव आहे, असे प्रतिपादन वसंत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'वसंत व्याख्यानमालेची शतकोत्तर वाटचाल' या पुस्तकावर श्रीकांत बेणी बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक माजी आ.नानासाहेब बोरस्ते होते.श्रीकांत बेणी पुढे म्हणाले की, सन १९२२ मध्ये रावसाहेब वझे यांनी वसंत व्याख्यानमालेची सुरुवात केली. पहिल्या वर्षी शंकराचार्य कु र्तकोटी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते त्यानंतर सलग दहा वर्ष त्यांनी अध्यक्षपद भूषवले. वसंत व्याख्यानमालेच्या माध्यमातून जगभरातील विविध विचारवंत, तत्त्वज्ञानी या मंचावर येऊन गेले. त्यामुळे गोदाकाठी वसंत व्याख्यानमालेला चांगल्या प्रकारचा प्रतिसाद मिळत गेला. नाशिककरांना विविधांगी विचारांची मेजवानी देत अनेक साहित्यकांनी या व्याख्यानमालेला समृद्ध केले आहे. महाराष्ट्रातील ही सर्वार्थाने वेगळी अशी वसंत व्याख्यानमाला शंभर वर्ष पूर्ण करून आज १०२ वर्ष पूर्ण करत आहे. याचा आम्हाला अभिमान वाटतो,असेही ते म्हणाले. संगीता बाफना आणि हेमंत देवरे यांचा ग्रंथभेट देऊन सन्मान करण्यात आला. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर मधुकर गिरी यांनी आभार मानले. दरम्यान येत्या शुक्रवारी (दि.११) राजेंद्र गांगुर्डे हे 'इरदडी' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### राष्ट्रीय मार्गदर्शकपदी संतोष मंडलेचा यांची निवड

**नाशिक ।** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष व अर्हम विज्जा फाउंडेशनचे सचिव संतोष मंडलेच्या यांची श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स राष्ट्रीय वरिष्ठ मार्गदर्शकपदी नियुक्ती झाली आहे. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन यांच्याकडून नियुक्तीपत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री अमित राय जैन यांनी याबाबतची माहिती दिली आहे. १०६ वर्षे जुन्या असलेल्या या संस्थेचे देशभरात ७२ हजार सभासद आहेत. जैन धर्माशी निगडित महत्त्वाच्या बाबींवर काम करण्यासाठी संस्थेमार्फत देशभरातून १८ लोकांची राष्ट्रीय वरिष्ठ मार्गदर्शकपदी नियुक्ती केली आहे. यात मंडलेच्या यांच्यासह महाराष्ट्रातून दोघांचा समावेश आहे. २०२५ ते २७ या दोन वर्षासाठी असलेल्या नियुक्ती कालावधीत जैन संघांना वेगवेगळ्या सूचना देऊन साधू संतांच्या समन्वयाने त्यांच्या मार्गदर्शनातून चातुर्मासाचे नियोजन करणे, सुख सुविधा उपलब्ध करून देणे, विविध समित्यांच्या माध्यमातून जैन धर्माशी निगडित कामे आधी जबाबदाऱ्या असतील. मंडलेचा यांचे कार्यक्षेत्र भारतभर असेल. त्यांनी २०१२ ते १७ या कालावधीत नाशिक रोड जैन श्रावक संघाच्या महामंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली आहे. उपाध्याय प्रवर परमपूज्य प्रवीण ऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने स्थापित झालेल्या अर्हम विजा फाउंडेशनच्या सचिवपदी ते कार्यरत आहेत.

### विंचूर विद्यालयात महात्मा फुलेंना अभिवादन!

**विंचूर ।** येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात



आली या प्रसंगी विद्यालयातील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी विद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी थोर समाज सुधारक, स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विषयी भाषणातून आपले विचार मांडले आदिती जेऊघाले, वेदिका फड, आदित्य घायाळ, कल्याणी जाधव, राणी दरेकर, सोहम सोनवणे, श्रुतिका दरेकर, श्रद्धा जेऊघाले, मानसी दरेकर, ज्ञानेश्वरी होन, श्रुती साबळे आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे उपमुख्याध्यापक सुरेश वाबळे होते. थोर महात्म्यांचे असे कार्यक्रम साजरे करत असताना अशा महात्म्यांचा आदर्श आपण घेतला पाहिजे व जीवनात यशस्वी होण्यासाठी नेहमीच एक आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. असे यावेळी बोलताना ते म्हणाले. सदर कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक नंदकुमार देवढे, पर्यवेक्षक सुदामराव माळी, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व विद्यालयातील उपशिक्षक राजेंद्र चांदे, ज्युनियर विभागाचे एचओडी राजेंद्र टिळेकर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

# आयएमए नाशिकच्या नूतन कार्यकारिणीचे शनिवारी पदग्रहण

## अध्यक्षपदी डॉ. नीलेश निकम



**नाशिक ।** इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) नाशिक शाखेच्या २०२५-२६ वर्षासाठी नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा शनिवारी (दि. १२) सायंकाळी महाराष्ट्र टीबी सॅनिटोरियम, म्हसरूळ नाशिक येथे भव्यदिव्य स्वरूपात पार पडणार आहे.

या कार्यक्रमात डॉ. नीलेश निकम हे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. त्यांच्यासोबत डॉ. मनिषा जगताप सचिवपदाची जबाबदारी स्वीकारतील. यावेळी डॉ. प्रशांत सोनवणे व डॉ. प्रेरणा शिंदे हे उपाध्यक्ष म्हणून काम पाहतील, तर खजिनदार म्हणून डॉ. अनिता भामरे यांची निवड झाली आहे. नूतन कार्यकारिणीत सदस्य म्हणून डॉ. कुणाल आहेर, डॉ. पूनम महाले, डॉ. समीर कोदारे, डॉ. निखिल सोनवणे, डॉ. अनुप भारती, डॉ. प्रतिभा बोरसे, डॉ. निकिता पाटील, डॉ. निलेश जेजुरकर, डॉ. स्वाती बंजारी, डॉ. जितेंद्र कोडिलकर, डॉ. पंकज चव्हाण आणि डॉ. सुमित शिंपी यांचा समावेश आहे. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून नाशिक महापालिकेच्या आयुक्त मनिषा खत्री, आमदार डॉ. राहुल आहेर आणि प्रसिद्ध पोटविकार तज्ज्ञ डॉ. प्रकाश जोशी हे उपस्थित राहून नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा देतील. नूतन अध्यक्ष डॉ. नीलेश निकम आणि सचिव डॉ. मनिषा जगताप यांनी पुढील कार्यकाळात डॉक्टरांच्या व्यावसायिक, मानसिक, शारीरिक व आर्थिक आरोग्यासाठी उपयुक्त उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांनी सांगितले की: "डॉक्टरांसाठी अभ्यासपूर्ण व्याख्यानमालांचा आयोजन, सहकार्य वाढवणारे उपक्रम, तसेच डॉक्टरांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय अडचणींवर तोडगा काढण्यासाठी शासन व प्रशासन यांच्याशी समन्वयाचे प्रयत्न केले जातील. ग्रामीण भागातील १००० मुलींसाठी मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिरे घेण्याचाही आमचा संकल्प आहे." याशिवाय आरोग्यविषयक जनजागृतीसाठी विविध उपक्रम, व्याख्यानमाला व आरोग्य शिबिरे देखील राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मावळत्या कार्यकारिणीच्या अध्यक्षा डॉ. सुधीर संकलेचा, सचिव डॉ. रविराज खैरनार व त्यांच्या कार्यतत्पर टीमने २०२४-२५ वर्षात उल्लेखनीय कार्य केले असून, त्यांच्या कार्याचा गौरव करत नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा देण्यासाठी सर्व IMA सदस्य व मान्यवरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# विवाहापूर्वी रक्त तपासणी आवश्यक : प्रा. प्रकाश पांगम

## मविप्र सिन्नर महाविद्यालयातून 'थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र' अभियानास प्रारंभ

**नाशिक ।** थॅलेसेमिया हा एक अनुवंशिक विकार आहे. या विकारावर अजून कोणतेही ठोस उपाय अस्तित्वात नाहीत. त्यामुळे या विकाराची रोखथाम करणे, हेच एक उपचारात्मक पाऊल आहे. हा विकार होऊच नये व त्याचा पुढे प्रसार होऊ नये, यासाठी तरुणांचे विवाहापूर्वी समुपदेशन होणे गरजेचे आहे. थॅलेसेमिया मायनर रुग्णाने दुसऱ्या मायनर रुग्णाशी लग्न केल्यास त्यांना होणाऱ्या अपत्याला थॅलेसेमिया हा विकार होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे विवाहापूर्वी तरुणांनी रक्ततपासणी करून घेणे आवश्यक आहे, असा मोलाचा सल्ला आश्रय संस्थेच्या आरोग्य विभागाचे सचिव प्रा. प्रकाश पांगम यांनी विद्यार्थ्यांना दिला.




मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक व आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था, ठाणे यांच्यामध्ये झालेल्या 'थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र' करारांतर्गत सिन्नर येथील मविप्र संचलित गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात थॅलेसेमिया या आजारावर प्रबोधन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार होते. आश्रय संस्थेबरोबर सिन्नर महाविद्यालयाचा सामंजस्य करार मागील वर्षी झालेला होता. त्या दरम्यान सिन्नर महाविद्यालयात गेले वर्षभर विविध समाजोपयोगी आरोग्य विषयक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले. आजच्या कार्यक्रमापासून मविप्र आणि आश्रय या दोन्ही संस्थांची 'थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र' या मोहिमेची दिमाखदार सुरुवात झाली. या उपक्रमाअंतर्गत आश्रय ट्रस्ट ही मविप्रच्या सर्व वरिष्ठ, कनिष्ठ, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण शाखांना भेट देऊन थॅलेसेमिया या विकाराबद्दल जनजागृती तसेच उपचारासंदर्भात मार्गदर्शन करणार असल्याचे प्रा. पांगम यांनी सांगितले. या कार्यक्रमास संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे व सर्व पदाधिकारी, सिन्नरचे संचालक कृष्णाजी भगत, मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव व डॉ. भास्कर ढोके यांचे मार्गदर्शन लाभले. आश्रय संस्थेबरोबर मविप्र संस्थेची ही 'थॅलेसेमियामुक्त महाराष्ट्र' मोहीम यशस्वी करण्यासाठी सिन्नर महाविद्यालय सतत अग्रस्थानी असेल, असे प्राचार्य आर. व्ही. पवार यांनी सांगितले. मविप्र व आश्रय यांच्या सामंजस्य करारामधून असेच अनेक विविध आरोग्य विषयक समाजोपयोगी, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन वर्षभर करणार आहोत, अशी ग्वाही आश्रय संस्थेचे संस्थापक डॉ. दीपक नाईक, सचिव प्रीती नाईक व गुरुप्रसाद नाईक यांनी दिली. प्रा. दीपाली सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी सोनवणे, स्टाफ सेक्रेटरी पोटे तसेच प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिमायेच्या कीर्तीध्वजाची सप्तश्रृंग गडावर मिरवणूक

**कळवण ।** आग ओकणारा सूर्य, त्यात पायी प्रवास. यामुळे अंगातून निघणाऱ्या घामाच्या धारांनी आदिमायेच्या भक्तीत चिंब भिजत लाखो भाविक गडावर दाखल झाले. त्यानंतर दर्शनबारीत तासनतास उभे राहत लाखो भाविक देवी चरणी लीन झाले. आई भगवतीच्या भेटीसाठी खानदेश प्रांतातून आलेले सुमारे दोन लाखांवर भाविक भक्त सप्तशृंगगडावर भक्तीसागरात दंग झाल्याचे पहायला मिळाले.

दरम्यान, शुक्रवारी (ता. ११) दुपारी आदिमायेच्या किर्तीध्वजाचे ट्रस्ट कार्यालयात विधीवत पूजन होवून ढफ-ढोलाच्या गजरात उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. रात्री १२ वाजता मध्यरात्री गडाच्या शिखरावर किर्तीध्वज फडकल्यानंतर खानदेशवासियांनी ध्वजाचे दर्शन घेतले. आद्यस्वयंभू शक्तीपीठ श्री सप्तशृंगी माता चैत्रौत्सवादरम्यान आजची चतुर्दशी (चौदस) निमित्त आदिमायेच्या दर्शनासाठी खानदेश वासियांच्या दृष्टीने विशेष महत्व असल्याने लाखावर भाविक सप्तशृंगीचा जयघोष करत ढोल-ताशांचा निनादात अनवाणी आलेल्या भाविकांचे पावले अविश्रांतपणे सप्तश्रृंगगड पायी रस्ता चढून आले.

पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दर्शनार्थी भाविकांची गर्दी वाढत जाऊन बाऱ्या लागल्या होत्या. सकाळी ७.३० वाजता






देवीच्या अलंकारांची ढोल- ताशाच्या गजरात विश्वस्त संस्थेच्या कार्यालयातून मिरवणूक काढण्यात आली.

भगवतीची आजची पंचामृत महापूजा श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टचे विश्वस्त मनज्योत पाटील व विश्वस्त डॉ. प्रशांत देवरे यांनी परिवारासमेवत केली. दुपार सत्रात विश्वस्त संस्थेच्या कार्यालयात किर्तीध्वजाची विधिवत पूजा विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश बी. व्ही. वाघ, उपविभागीय अधिकारी अकुनरी नरेश, तहसीलदार रोहिदास वारुळे, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी ॲड. ललित निकम, अड. दीपक पाटोदकर, मनज्योत पाटील, डॉ. प्रशांत देवरे, भूषणराज तळेकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, ध्वजाचे मानकरी एकनाथ गवळी, विष्णू गवळी. कृष्णा गवळी, काशिनाथ गवळी, आनंदा गवळी, दत्तू गवळी, ट्रस्टचे व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे, सहाय्यक व्यवस्थापक भगवान नेरकर, इस्टेट कस्टोडियन प्रकाश पगार, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, पोलिस पाटील शशिकांत बेनके आदींनी केले.

## महत्त्वाचे

### परिवहन मंत्र्यांना ४४ टक्के उर्वरित वेतनाबाबत निवेदन

**नाशिक ।** एस.टी. कामगराचा मार्च महिन्याचा राहिलेला ४४% पगार त्वरित करावा, या व इतर मागण्यांसाठी परिवहन मंत्री प्रताप



सरनाईक यांना कामगार नेते स्व. जयप्रकाश छाजेड एस.टी. वर्कर्स कॉंग्रेसचे अध्यक्ष प्रितीश जयप्रकाश छाजेड, सरचिटणीस आर डी गवळी, कार्याध्यक्ष अशोक जाधव व डी ए लिपणेपाटील यांनी निवडणं दिले. कामगारांच्या प्रश्नावर लवकरच कामगार नेते जयप्रकाश छाजेड एस टी वर्कर्स कॉंग्रेस बरोबर लवकरच मीटिंग घेतो व सविस्तर चर्चा करू, असे आश्वासन यावेळी सरनाईक यांनी दिले.

### प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराकरिता अर्ज सादर करण्याचे आवाहन

**नाशिक ।** केंद्र सरकारने प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ साठी अर्ज मागविले आहेत. ज्या मुलांनी शिक्षण, कला, संस्कृती कार्य, खेळ नाविण्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरीब करण्याऱ्यांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी https://awards.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने ३० जुलै २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील दुसाने यांना प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. या पुस्कारासाठी मुलांचे वय ५ वर्षापेक्षा अधिक व ३१ जुलै २०२५ रोजी 18 वर्षापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अशा मुलांचे प्रस्ताव स्वतः मुले किंवा त्यांच्या वतीने राज्य सरकार, केंद्र शासित प्रदेश, जिल्हाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी, पंचायत राज संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था अर्ज करू शकतात, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

### राजीव गांधी भवन येथे महात्मा फुलेंना अभिवादन

**नाशिक ।** क्रांतीसुर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त नाशिक महापालिकेच्यावतीने राजीव गांधी भवन, मुख्यालय येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महापालिका आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरीक्त आयुक्त प्रदीप चौधरी, करिष्मा नायर, उपआयुक्त नितीन पवार, नितीन नेर, अधीक्षक अभियंता अविनाश धनाईत, कार्यकारी अभियंता बाजीराव माळी, उपअभियंता खैरनार, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, योगेश आडभाई, मनिषा पाटेकर, शंकर पोरजे, संतोष चंद्रात्रे, साहेबराव भोसले, नितीन बागुल, सोमनाथ कासार, पल्लवी वक्ते, रंजना शिंदे, राजू वर्मा, भाग्यश्री कानडे, मंगेश नवले आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महात्मा फुले यांनी समाजातील शोषित, वंचित आणि मागास घटकांसाठी केलेले कार्य, त्यांच्या सामाजिक सुधारणांचा आदर्श समोर ठेवत उपस्थितांनी अभिवादन करून महात्मा फुले यांच्या कार्याचे स्मरण करीत त्यांच्या विचारांची प्रेरणा घेण्याचा संदेश देण्यात आला.



## महापालिकेतर्फे महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन

**नाशिक ।** महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त नाशिक महापालिकेच्यावतीने मुंबई नाका येथील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मारकात अभिवादन करण्यात आले.

महात्मा जोतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त नाशिक महानगरपालिकेच्या वतीने मुंबई नाका येथील फुले स्मारकात अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक न्याय आणि शिक्षणाच्या अग्रदूत असलेल्या महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीस पुष्पार्पण करून त्यांना कृतज्ञतेची मानवंदना महापालिका आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी उपस्थित राहून अभिवादन करून दिली. त्यांच्या समवेत उपआयुक्त नितीन पवार, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, माजी स्थायी समिती सभापती नानासाहेब महाले, नगरसेवक दत्ताजी पाटील, उत्सव समिती अध्यक्ष अंबादास खैरे, समता परिषद प्रदेश सरचिटणीस समाधान जेजुरकर शंकरराव पोरजे, साहेबराव भोसले तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजसुधारणेचा वसा पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत नाशिक शहरात सामाजिक समता आणि शिक्षणाचा प्रकाश अधिक व्यापक करण्याचा संदेश दिला.

## जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी : जिल्हाधिकारी




**नाशिक ।** जिल्ह्यात १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे सूक्ष्म नियोजन करून प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिल्या.

राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शुक्रवारी (दि.११) दुपारी 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' पूर्व तयारीबाबत दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आढावा घेतला. त्यानंतर आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी शर्मा बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रिया देवचक्के आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी शर्मा म्हणाले की, राज्यातील सिंचन व बिगर सिंचनाचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न शासनाच्या माध्यमातून केले जात आहेत. पाण्याची उपलब्धता व पाणी वापराचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचा गरजेपुरता वापर करणे, नैसर्गिक जलस्त्रोत, नद्या, जलाशयांचे प्रदूषण रोखणे, पायाभूत सुविधांचे संरक्षण करणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांच्या पालनाबाबत समाजात जागृती करीत जल साक्षरता वाढविण्यासाठी जल व्यवस्थापन कृती पंधरवडा राबविण्यात येणार आहे. त्याचे नियोजन जलसंपदा विभागाने करावे. जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यात धरण परिसराचे संवर्धन, कालवा, पाटचारीची स्वच्छता करून कालवे प्रवाहित करावेत. कालव्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करावे.

जलसंपदा विभागांच्या मालमत्तांची माहिती अद्ययावत करावी. त्यासाठी भूमी अभिलेख विभागाची मदत घ्यावी. या पंधरवड्यात शेतकऱ्यांशी संवाद साधण्याचे नियोजन करावे. तसेच पाण्याची गळती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशाही सूचना जिल्हाधिकारी शर्मा यांनी केल्या.

## विज्ञानाची वारी, 'मविप्र' काचुर्ली आश्रमशाळेच्या दारी




**नाशिक ।** मविप्र माजी विद्यार्थी संघटना व नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई यांच्या सहकार्याने भ्रमणशील विज्ञान प्रयोगशाळा त्र्यंबकेश्वर तालुक्यातील काचुर्ली येथील मविप्र समाजाच्या आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या भेटीला आली होती.

यावेळी या प्रयोगशाळेत विविध प्रकारचे २० प्रयोग-प्रात्यक्षिके -प्रतिकृती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बघायला तसेच अनुभवायला मिळाल्या. प्रत्यक्ष प्रतिकृती हाताळताना विद्यार्थ्यांना कुतूहल निर्माण होऊन कृतीचा आनंद होत होता. यावेळी विविध प्रत्यक्षिकांतील वैज्ञानिक तत्वे विद्यार्थ्यांना स्पष्ट करण्यात आले. तसेच काही विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत प्रयोगांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे 'विविध जादूच्या प्रयोगांच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन व त्यातील वैज्ञानिक तत्व नेहरू विज्ञान केंद्राचे मार्गदर्शक शेखर मरकड, अनिकेत ठोके, पृथ्वीराज पाटील यांनी सविस्तर स्पष्ट केले. त्याशिवाय पृथ्वीची निर्मिती, पृथ्वीवर सजीवांची निर्मिती यावियषीची व्हिडिओ प्रोजेक्टरवर दाखविण्यात आले. या फिरत्या विज्ञान प्रयोगशाळेचा हा अनुभव विद्यार्थी व शिक्षकांसाठी आगळावेगळा अनुभव होता. यावेळी शाळेतील १ ली ते ८ वीच्या जवळपास ३३० विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

यासाठी मविप्र माजी विद्यार्थी संघटनेचे प्रशांत निकाळे व सदस्यांनी नियोजन केले होते. यावेळी नवनाथ ठाकरे, तुषार पवार, अविनाश भिसे यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## मनमाडला काढण्यात आलेल्या हुंकार रॅलीला प्रचंड प्रतिसाद

**नांदगाव ।** बिहार राज्यातील महाबोधी महाविहार हे ब्राह्मण व इतर धर्मियांच्या ताब्यातून मुक्त करावे यासाठी देशभरात बिहार राज्यातील महाबोधी महाविहार येथे सुरू असलेल्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी गुरुवारी (दि.१०) मनमाड शहरात काढण्यात आलेल्या हुंकार रॅलीस मोठ्या संख्येने आंबेडकरी नागरिक, महिला, पुरुष युवक हातात निळे ध्वज, पंचशीलाचे धम्मद्वज हातात घेऊन सहभागी झाली होते. या रॅलीत निषेध पर जोरदार घोषणाबाजी करण्यात आल्या.

भंते दीपंकर व भंते उपाली बोधी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची सुरुवात मनमाड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह येथून झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषात महाबोधी महाविहार मुक्तीच्या जयघोषक सुरुवात झाली. मनमाड शहरातील सर्व मोक्याच्या ठिकाणाहून रॅली




काढण्यात आली. रॅलीचे डॉ.आंबेडकर पुतळा येथे या रॅलीचे सभेत रूपांतर झाले.

याप्रसंगी प्रवीण पगारे, पी आर निळे, रवी निकम व भंते उपालि बोधी यांची भाषणे झाली. प्रसंगी बौद्धचार्य अर्जुन साळवे यांनी गीत गायले. उपस्थित भगिनी यांच्या हस्ते मंडल अधिकारी यांचेमार्फत नांदगाव तहसील कार्यालयाचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी मनमाड शहर पोलीस निरीक्षक विजय करे व पोलीस कर्मचारी यांनी रॅली दरम्यान संरक्षणाची जबाबदारी उत्तमरित्या पार पाडली. रॅली दरम्यान फुले, शाहू, आंबेडकर मुस्लिम मूलनिवासी विचार मंच यांच्यावतीने पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय करण्यात आली होती.

आंदोलन प्रसंगी सर्व पक्षांचे नेते तथा बौद्धचार्य उपस्थित होते. महत्त्वाचे म्हणजे महिलांची व युवकांची उपस्थिती यावेळी लक्षणीय ठरली. यावेळी महाबोधी महाविहार हे ब्राह्मण व इतर दरम्यानच्या जोखडातून मुक्त करावे (२) बि टि ॲक्ट 1949 रद्द करावा, महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, सरकारने बौद्धांच्या धार्मिक गोष्टीत हस्तक्षेप करू नये. आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. सदर हुंकार रॅलीचे आयोजन संविधान प्रेमी कथा आंबेडकरवादी मनमाड शहर यांनी केले.

# ज्ञान, शक्ती, भक्ती, ऊर्जा व बुध्दिमत्तेचा महासागर
# संकटमोचन महाबली हनुमान

महाबली हनुमान सर्वांचेच संकट मोचन आहेत. हनुमान जन्मोत्सव दरवर्षी चैत्र पौर्णिमेला येत असते. चैत्रशुध्द प्रतिपदेला गुढीपाडवा म्हणजेच हिंदू धर्माचे नवीन वर्ष, यानंतर चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्मोस्तव आणि चैत्र पौर्णिमेला हनुमान जन्मोत्सव साजरा केल्या जाते.भगवान प्रभु रामचंद्र विष्णुचे अवतार आहे तर महाबली हनुमान शंकरजींचा अवतार आहे.

------------

मुख्यत्वेकरून हनुमानाची पूजा रूईच्या फुलांनी केली जाते. भारतात हनुमान जन्मोत्सवाला पुजाअर्चना करून भव्य शोभायात्रा मोठ्या प्रमाणात काढण्यात येते. महाबली हनुमान हे राम भक्त होते. त्यांच्याजवळ ज्ञान आणि गुनांचा मोठा भंडार होता. त्याचप्रमाणे आपल्यावर जेव्हा-जेव्हा संकटे ओढावतात तेव्हा-तेव्हा आपण हनुमानाला साकडे घालत असतो म्हणूनच हनुमानाला संकटमोचन म्हटल्या जाते.

हनुमानाने रावण दरबारी रामाचे दुत म्हणुन चोख भुमिका बजावली.रावण महाग्यानी व राजनितीज्ञ होता. परंतु अहंकारी असल्याने त्याने संपूर्ण मयार्दांचे उल्लंघन करून हनुमानाच्या शेपटीला आग लावली. परंतु याचा रावणावर विपरीत परिणाम झाला. कारण हनुमान रामाचे दुत म्हणून रावण दरबारी गेले होते.

त्यामुळे हनुमानाने संपूर्ण लंका आगीच्या स्वाधीन करून लंका दहन केले आणि हनुमानाने आपल्या रामभक्तीचे, ज्ञानाचे व शक्ती प्रदर्शन केले. कारण रामाचे संकट म्हणजे स्वतःचे संकट असे हनुमान समजत आणि रामाच्या सुरक्षेसाठी असुरी शक्तीचा संहार करण्यास मदत केली व असुरी शक्तीचे पानीपत केले.महाबली हनुमान रामकथेतील मुख्य सुत्रधार समजल्या जाते. राम, लक्ष्मण, सिता यांच्या सोबत हनुमानाची भुमिका वटवृक्षाच्या सावली सारखी अफाट असल्याचे दिसून येते. तिच प्रतीकृती आज भारतात प्रत्येक मोहल्लात व गावात दिसून येते.

मोहल्या-मोहल्यात व गावा-गावागातील जवळपासच्या पटांगणामध्ये हनुमानजींचे मंदिर दिसुन येते. गावातील कठीण प्रसंग असो किंवा आपल्या स्वतः वरील कठीण प्रसंग असो किंवा आनंदाचा प्रसंग असो किंवा शुभ प्रसंग अशा प्रसंगी सर्वच महाबली हनुमान यांना साकडे घालुन आलेले संकट व येणारे संकट दुर करण्यासाठी आणि सुखःशांती निर्माण व्हावी यासाठी पुजाअर्चना केली जाते व साकडे घातले जाते.



श्रीराम,लक्षण व सीता १४ वर्षे वनवासात असतांना बजरंबली हनुमान व त्यांच्या संपूर्ण वानरसेनेणे सुरक्षा कवच बनुन कार्य केले.कारण बजरंबली हनुमान अहोरात्र रामाचाच जप करायचे म्हणुनच रामाचा जय-जयकार करतांना रामासोबतच हनुमानाचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. याप्रमाणे "सीयाबल रामचंद्र की जय पवनसुत हनुमान की जय" म्हणजेच जीथे राम तीथे आपल्याला बजरंग बली हनुमान दिसून येतो. सीतामाई यांनी ठरवीले की आपल्यासाठी रावणासारख्या बलाढ्य शत्रूशी वानरसेनेने आणि हनुमान यांनी लढा दिला म्हणुन प्रत्येकाला काहीतरी द्यायचे म्हणून भेट वस्तू दिल्या.

यात हनुमानाचा पराक्रम पाहून त्या अती प्रसन्न होत्या. त्यामुळे हनुमानाला आगळीवेगळी मोठी वस्तु भेट देण्याचे ठरवले.

अशावेळी सीतामाईने आपल्या माहेरवरून मिळालेला नवरत्नाचा हार हनुमानाला आदरतिथ्याने भेट दिला. हनुमानाने हाराचा सन्मानाने स्वीकार केला. परंतु काही क्षणात हनुमानाने हारातील मनी दातांनी तोडायला सुरुवात केली.

सीतेच्या तळपायाची आग मस्तकात गेली व हनुमानाला जाब विचारला तेव्हा हनुमान म्हणाले माई ज्या वस्तुत राम- सीता नाही त्याचा मला काय उपयोग? मी रामभक्त आहे असे म्हणत हनुमानाने आपली छाती फाडून आपल्या ह्रदयात राम-सीता आहे हे सीतामाईला दाखवून दिले.

हनुमानाची भक्तीपाहुन प्रभुश्रीराम म्हणाले तुझे माझ्यावर एवढे ऋण आहे की मी तुला काय भेट देणार? यावर हनुमान म्हणाले हे प्रभुरामचंद्र द्यायचेच असेल तर एकच आशिर्वाद द्या, जीथे-जीथे तुमचे भजन-किर्तन सुरू असेल त्याचे श्रवण करण्याची मला संधी द्या.यावर श्रीराम तथास्तु म्हणाले!

तेव्हापासून जिथे-जिथे रामनाम सुरू असते, रामाचा गजर होतो तिथे-तिथे महाबली हनुमानाचे नाव आदराने आपोआप येते. हनुमान जन्मोत्सवाला सर्वांनीच पवनपुत्र महाबली हनुमान यांना साकडे घालुन धरतीवरील कमी होत असलेल्या प्राणवायूची मात्रा पुर्ण करण्यासाठी देशातील संपूर्ण हनुमान भक्तांनी हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. करोना काळात प्राणवायूचा पुरवठा न मिळाल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले होते.

यामुळे वृक्ष लागवडीमुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन व प्राणवायू मिळण्यास मोठी मदत होईल याचा फायदा मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतु यांना मोठ्या प्रमाणात मिळेल. यामुळे आपल्याला पृथ्वीतलावर हनुमान प्रगट झाल्याचे अवश्य दिसून येईल.

सध्याच्या परिस्थितीत सोशल मीडियाच्या युगात आजचा युवा वर्ग बुध्दीने जरी हुशार आणि तर्बेज असला तरी शारीरिक दृष्ट्या परीपक्व नाही. महाबली हनुमान हे शक्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येकांनी हनुमानाचे नामस्मरण करून आपल्या आरोग्यासाठी दररोज व्यायाम करणे गरजेचे आहे.

यामुळे उर्जा निर्माण होवून शरीर सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल. हे पवणपुत्र हनुमान या कलियुगात भ्रष्टाचार एवढा शिगेला पोहोचला आहे की मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने भ्रष्टाचार, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या व महागाईच्या रूपात असुरी शक्ती निर्माण झाली आहे. असुरी शक्तीमुळे आज सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.

या कठीण प्रसंगी हे पवनपुत्र हनुमंता वायुरूपात या धर्तीवर प्रगट हो आणि वाममार्गाने चल-अचल संपत्ती कमवणाऱ्यां असुरांना त्यांची जागा दाखवून सर्वसामान्यांना महागाईच्या संकटातून बाहेर काढ.

कारण मुठभर भ्रष्टाचाऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. अशा संकट प्रसंगी हे संकटमोचन महाबली हनुमान आपण कोणत्याही रूपात पृथ्वीतलावर धावुन यावे अशी आपल्या चरणी प्रार्थना करतो. आज हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून सर्वांनीच वृक्षारोपणाचा संकल्प करावा यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल.

यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली व मानव-जीवजंतुंना शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल. असे जर झाले तर प्रत्येक झाडात, पानात, फुलात व फळात आपल्याला महाबली हनुमानजींचे दर्शन अवश्य होईल. कारण महाबली हनुमान नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे. एक मुखाने बोला जय जय हनुमान!!!

---------------

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

■ ■ ■

# भक्तशिरोमणी हनुमान!



भक्त कसा असावा तर तो महाबली हनुमंतासारखा असावा. हनुमंताची प्रभू श्रीरामांप्रती असलेल्या निस्सीम भक्तीची आजतागायत अनेक उदाहरणे आपण गोष्टींच्या रूपाने वाचली आणि ऐकली आहेत.

प्रचंड सामर्थ्य असतानाही आपल्या आराध्याप्रती कसा भक्तिभाव असावा हे हनुमंताच्या जीवनचरित्रावरून लक्षात येते. सप्त चिरंजीवांपैकी एका असलेल्या भक्तशिरोमणी हनुमंताची जयंती यंदा शनिवारी आल्याने तिला विशेष महत्व असणार आहे. अशा भक्तवत्सल, महाबली हनुमंताची प्रभू श्रीरामांप्रती असलेल्या भक्तीचे एक उदाहरण आज आपण पाहणार आहोत

एकदा हनुमानाची निस्सीम भक्ती पाहून प्रभु श्रीरामाने हनुमानाला वर मागण्यास सांगितले. जो कुणी प्रभु श्रीरामाचे स्मरण करत असेल, त्याचे संरक्षण हनुमंत करील आणि कुणीही त्या व्यक्तीचे अहित करू शकणार नाही, असा वर हनुमानाने मागितला.

प्रभु श्रीरामाने तथास्तु म्हटले. त्रेतायुगात प्रभु श्रीराम अयोध्येचे राज्य करत असतांना काशीनरेश सौभद्रच्या मनात रामभेटीची मनीषा जागृत झाली. त्याच वेळी महर्षि विश्वामित्र यांच्याही मनात प्रभु श्रीरामाला भेटण्याची इच्छा निर्माण झाली. दोघेही अयोध्येच्या दिशेने निघाले. वाटेत एका शिव मंदिरात दोघांची भेट झाली. विश्वामित्रांचे शिष्य शिवाच्या मंदिरात विश्वामित्रांचा जयजयकार करत होते.

शिवाच्या मंदिरात केवळ शिवाचाच जयघोष झाला पाहिजे, अन्य कुणाचाही जयजयकार केला, तर शिवाचा अपमान होतो, असे सौभद्र राजाला वाटले आणि त्याने विश्वामित्रांच्या जयजयकाराला विरोध केला. त्यामुळे महर्षि विश्वामित्र त्याच्यावर कोपले आणि त्यांच्यात वाद झाला. दोघेही जेव्हा अयोध्येत पोचले, तेव्हा त्यांना एकाच वेळी प्रभु श्रीरामाचे दर्शन झाले.

महर्षि विश्वामित्रांनी प्रभु श्रीरामाला काशीनरेशाला कठोर शिक्षा करण्याची आज्ञा केली. प्रभु श्रीरामाने दुसऱ्या दिवशी न्यायसभेत वरील प्रसंगाचा न्यायनिवाडा करणार असल्याचे घोषित केले. प्रभु श्रीराम महर्षि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून आपल्याला कठोर दंडित करतील, या विचाराने सौभद्र भयग्रस्त झाला.

इतक्यात तेथे नारदमुनी प्रगट झाले आणि त्यांनी सौभद्राला हनुमंताची माता अंजनीदेवीला शरण जाण्यास सांगितले. नारदमुनींच्या सांगण्यावरून सौभद्र सुमेरूला गेला आणि त्याने अंजनीमातेचे चरण धरले. अंजनीमातेने त्याची स्थिती जाणून घेतल्यावर त्याचे रक्षण करण्याचे अभय वचन दिले.

तिने हनुमंताला काशीनरेशाचे रक्षण करण्याचे दायित्व सोपवले. हनुमानाने ते स्वीकारले आणि तो दुसऱ्या दिवशी सौभद्राला सोबत घेऊन पवन वेगाने अयोध्येला येऊन पोचला. त्याने सौभद्रराजाला निर्भय होऊन शरयू नदीच्या किनारी अखंड रामनामाचे स्मरण करत रहाण्यास सांगितले.

सौभद्रराजाने अचानक पलायन केल्याची वार्ता दुसऱ्या दिवशी महर्षि विश्वामित्रांना समजल्यावर ते अधिकच कोपित झाले. त्यांनी श्रीरामाला सौभद्राचा वध करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे प्रभु श्रीरामाने सूर्यास्त होण्यापूर्वी सौभद्राचा वध करण्याचा पण केला.

प्रभु श्रीरामाचे सैनिक सौभद्राला सर्वत्र शोधत होते. त्यांनी तो शरयू नदीच्या किनारी हनुमंतासह रामनामात मग्न असल्याची सूचना महर्षि विश्वामित्र आणि श्रीराम यांना दिली. महर्षि विश्वामित्रांसह प्रभु श्रीराम धनुष्य बाण घेऊन शरयू किनारी आले. त्याने पाहिले की, हनुमान पुढे बसलेला आहे आणि त्याच्या मागे सौभद्र राजा बसलेला आहे.

दोघेही रामनामाचा अखंड जप करत आहेत. प्रभु श्रीरामाने हनुमानाला बाजूला होण्यास सांगितले, तेव्हा हनुमानाने श्रीरामाला त्यांनी पूर्वी दिलेल्या वचनाची आठवण करून दिली. महर्षि विश्वामित्रांनी सौभद्रावर बाण चालवण्याचा आग्रह केला. प्रभु श्रीरामाला कळेना, हनुमानाला दिलेले वरदान खरे करावे कि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून केलेला पण पूर्ण करावा?

अखेर गुरुस्थानी असणाऱ्या महर्षि विश्वामित्रांच्या आज्ञेवरून प्रभु श्रीरामाने सौभद्रावर बाण सोडला. हनुमानाच्या कृपेमुळे सौभद्राभोवती रामनामाचे संरक्षण निर्माण झाले होते. त्यामुळे प्रभु श्रीरामाचा बाण सौभद्राला लागला नाही. प्रभु श्रीरामाने अनेक बाण सोडले; परंतु एकही बाण सौभद्राला लागला नाही.

रामबाण विफल होत आहेत, हा चमत्कार पाहून महर्षि विश्वामित्र थक्क झाले. त्यांनी अंतर्मुख होऊन विचार केला आणि त्यांच्या लक्षात आले की, भगवंताला स्वतःच्या वचनापेक्षा भक्ताला दिलेले वरदान पूर्ण होणे अधिक महत्त्वाचे वाटते. त्यामुळे त्यांनी श्रीरामाला पण मागे घेण्यास सांगितले. हनुमानाने काशीनरेश सौभद्राला महर्षि विश्वामित्रांचे चरण धरून क्षमा मागण्यास सांगितले. त्याप्रमाणे सौभद्रने महर्षि विश्वामित्रांची क्षमा मागितली आणि महर्षि विश्वामित्रांनी त्याला क्षमा केले.

अशा प्रकारे हनुमानाने प्रभु श्रीरामाला धर्मसंकटातून सोडवले आणि सौभद्र राजाचे रक्षणही केले. वरदान आणि पण यांच्या युद्धात वरदानाचा विजय झाला. जर एखादा रामनामाचा जप करत असेल आणि प्रभु श्रीरामाने त्यावर बाण चालवला, तरी त्याचे काहीही अहित होत नाही, हे या प्रसंगातून दिसून येते. भक्तशिरोमणी हनुमानाने रामसे बडा रामका नाम ही म्हण सार्थ ठरवली.

----------------

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■

# बाबासाहेबांच्या लढ्याप्रती एकनिष्ठ राहण्याची गरज



**दादासाहेब पी. बी.खडसे**
**मुख्य संपादक**
**लोकतंत्र नायक**

जातिवाद, मनुवाद, भेदाभेद, विषमता, अन्याय, अत्याचार, शोषण, अंधश्रद्धा या अमानवीय प्रवृत्या विरोधात भारतरत्न, महामानव, विश्वभूषण, बोधिसत्व, मुक्तिदाता, भारतीय संविधानाचे शिल्पकार, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रणशिंग फुंकले आणि लढा दिला. समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व ही विचारतत्वे, विचारधारा भारतीय संविधानाच्या माध्यमातून देशाला अर्पण केलीत.

आज संपूर्ण भारत देशाची व्यवस्था, राज्य कारभार भारतीय संविधानुसार चालत आहे, भारतीय संविधानानुसार भारतातील प्रत्येक नागरिकाला समता,स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व या विचार तत्वांची फळे चाखता यावीत यासाठी देश पुढे मार्गक्रमन करीत आहे. भारतीय संविधानामुळेच समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व या हक्क विचारधारेची हमी प्रत्येक भारतीयाला भारतीय संविधानाचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच मिळाली आहे. असे असतानाही मनुवादी विचारसरणीचे विषमतावादी, जातीवादी लोक डोके वर काढू पहात आहेत.

दलित, शोषित, पिढीता वरील जातीय भेदभावातून अन्याय अत्याचार आजही वाढतच आहे. अनुसूचित जाती, जमाती, आदिवासी आणि स्त्रिया यांचे न्याय, हक्क व अधिकार हिरावल्या जात आहेत. दलित, शोषितांना भारतीय संविधानानुसार न्याय मिळणे कठीण व दुर्लभ असेच होऊन बसले आहेत. बेरोजगारी व गरिबी वाढत आहे. श्रीमंत हा अधिक श्रीमंत बनत आहे पुंजीवादाने डोके वर काढलेले आहे.

मुक्तिदाता, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र तुम्हा आम्हाला दिला. समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व प्राप्त करण्यासाठी मुक्तिदाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या सामाजिक राजकीय व धार्मिक स्तरावरील सर्वच लढ्याला मनुवाद्यांनी खिंडारे पाडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेला हा "भीम लढा" मनुवाद्यानी साम-दाम -नीती -दंड -भेद वापरून कमकुवत, कमजोर केलेला दिसतो.

मुक्तीदाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिवार्णानंतर या भिम लढ्याला मनुवाद्यांच्या दावणीला बांधण्याचे काम तथाकथित बेईमान पुढाऱ्यांनी केल्याचे दिसते. मुक्तिदाता, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व लढ्या प्रति आंबेडकरी अनुयायांनी एकवटून, एकसंघ होऊन समता, स्वातंत्र्य व बंधुत्व व न्यायासाठी प्रामाणिक व एकनिष्ठ होऊन लढण्याची खऱ्या अर्थाने आज गरज आहे.

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाच्या रक्षणाची आज गरज आहे. भगवान बुद्धाची धम्मतत्वे रोजच्या जीवनात प्रामाणिकपणे अंगीकारण्याची गरज आहे.

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी महाविहार हे अद्यापही कथित मनुवादी लोकांच्या ताब्यात आहे, महाबोधी बुद्ध विहार मनुवाद्यांच्या ताब्यातून मुक्त करणे गरजेचेआहे. भगवान बुद्ध यांच्या मूर्ती असलेले अनेक मंदिरांवर मनुवादी लोकांचा ताबा आहे, हे पुरातन बुद्ध विहारे मनुवादी पुरोहितांच्या ताब्यातून मुक्त होणे गरजेचे आहे.

अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कमजोर करण्यात आला आहे, दलित, शोषित, पिढीतांच्या न्याय व रक्षणासाठी ॲट्रॉसिटी ॲक्ट या कायद्याला अधिक शक्तीशाली व मजबूत करने काळाची गरज आहे. अनुसूचित जाती, जमाती,बौद्ध व आदिवासी यांच्या विकास व कल्याणाकरिता शालेय व महाविद्यालयीन शिक्षण सरसकट मोफत करण्याची गरज आहे.

अनेक सरकारी व्यवस्थापन संस्थांचे खाजगीकरण करण्याचा घात आखल्या जात आहे, ते थांबवणे गरजेचे आहे. गरिबी आणि बेरोजगारी वाढत आहे, दारिद्रय निर्मूलन होऊन रोजगार उपलब्ध करणे गरजेचे आहे.

स्त्रियांवरील होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वेळीच रोक थांब करण्याची नितांत गरज आहे. तसेच वाढत्या अंधश्रद्धेचे निर्मूलन करने गरजचे आहे. देशात व राज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढत चाललेला आहे, या वाढत्या भ्रष्टाचाराला समूळ नष्ट करने देशाच्या प्रगती व विकासासाठी आवश्यक आहे.

यापुढील आंबेडकरी आंदोलनाचा लढा या समग्र दिशेने सामाजिक व राजकीय पटलावर मार्गक्रमण होणे तसेच करणे उपाय योजना आखने आवश्यक आहे आणि हा आंबेडकरवादी लढा लढण्याची जबाबदारी तुम्हा आम्हा वर येऊन ठेपलेली आहे, हा आंबेडकरवादी लढा आपण लढलाच पाहिजे ती तुमची माझी व आपण सर्वांची प्रामाणिक जबाबदारी आहे.

सोबतच आंबेडकरवादी आंदोलनाला बेईमान व गद्दार झालेल्या नाटकी, बेईमान व्यक्तींच्या नांग्या आता ठेचून काढण्याची जबाबदारी आंबेडकरवादी नवयुवकांवर येऊन ठेपलेली आहे. आंबेडकरवादी असल्याचा खोटा बुरखा घालणाऱ्या नाटकी पुढारी, व त्यांच्या कार्यकर्त्यांना आंबेडकरवादी चळवळीतून हद्दपार करण्याची गरज आहे.

नाटकी, संधीसाधू, बेईनानांना ओळखून आंबेडकरवादी आंदोलनाची धार, गती,अधिक तीव्र व तीष्ण केली तरच शोषित पिढीतांचे न्याय व हक्क तुम्हा - आम्हाला साबुत ठेवता येईल, हे सूर्यप्रकाशाइतके अमिट सत्य आहे.

अन्याय, अत्याचार, शोषण, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार जातीयवाद, आणि मनूवादा विरुद्ध मुक्तिदाता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रत्येक अनुयायी, " सच्चा पॅंथर," एकसंघ,एकसंघटित होऊन शोषित, पीडित, वंचितांच्या समता, न्याय व हक्कासाठी लढला पाहिजे आणि ती खरी गरज आहे.

विश्वभूषण, विश्वरत्न, महामानव,बोधिसत्व, भारतरत्न, मुक्तिदाता, भारतीय संविधानाचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या येणाऱ्या 134 व्या जयंती दिनानिमित्त तमाम भारतीय जनतेस मंगलमय हार्दिक शुभेच्छा. जय भीम..!!! जय संघर्ष...!!!

●●●●●

# क्रांतिसूर्य महात्मा फुले



शिक्षक, लेखक, समाजसुधारक आणि स्त्री शिक्षणाचा पाया घालणारे महात्मा जोतिबा फुले यांची जयंती ११ एप्रिल रोजी साजरी केली जाते. या निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावी झाला. त्यांचे मूळ नाव 'ज्योतिराव गोविंदराव फुले' असे होते. त्यांच्या वडिलांचा फुलांचा व्यवसाय असल्यामुळे त्यांना 'फुले' हे आडनाव मिळाले.

जेव्हा जोतिबा फक्त ९ महिन्याचे होते, तेव्हा त्यांच्या आईचा मृत्यू झाला. त्यामुळे त्यांची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्या वडिलांवर आली. लहानपणीच आई गेल्यामुळे जोतिबांचा स्वभाव गंभीर आणि समंजस बनला. आईचा आधार नसतानाही त्यांनी शिकण्याची इच्छा मनात ठेवली. जोतिबा जेव्हा शाळेत जात होते, तेव्हा त्यांच्या घरातील लोक आणि समाज शिक्षणाला विरोध करत होते. तरीही त्यांनी स्कॉटिश मिशन शाळेत प्रवेश घेतला. एकदा ते शाळेत जात असताना काही लोकांनी त्यांची थट्टा केली, पण जोतिबा डगमगले नाहीत. उलट त्यांनी ठरवले की, "माझ्यासारख्या सगळ्यांना शिकायला मिळाले पाहिजे!"

महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुलेंना शिकवले आणि त्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका बनवले. त्यांनी १८ शाळा काढल्या. त्यांनी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाज' स्थापन केला. त्यांनी गुलामगिरी, शेतकऱ्याचा असूड यासारखी पुस्तकंही लिहिली. महात्मा फुले यांचा मृत्यू २८ नोव्हेंबर १८९० रोजी झाला. पण त्यांच्या कार्यामुळे आजही आपण शिक्षणाचा प्रकाश पाहतो.

-------------

**क्षितिज कोल्हे**
**जि. प. प्राथमिक शाळा सुकळी, केंद्र कोठा.**
**ता. कळंब. जि. यवतमाळ.**

■ ■

**वाचक लिहितात**

## हनुमंताच्या कायार्तून मुलांचा व्यक्तिमत्व विकास!

हजारो वर्षांपासून आपण रामभक्त हनुमानाची भक्ती करत आलो आहोत. हनुमंताची दास्यभक्ती हे परमोच्च आदशार्चे प्रतीक आहे. प्रभू रामासारख्याच उच्च स्थानावर हनुमंताचे स्थान आपल्या ह्रदयात आहे.

हनुमंताचा जन्म चैत्र शुद्ध पौर्णिमेला झाला. जन्मताच त्यांनी आपल्या अद्भुत शक्तीचे प्रदर्शन केले आणि सूयार्ला फळ समजून गिळण्यासाठी झेप घेतली. सप्तचिरंजीवांपैकी एक असलेले वीर हनुमान हे केवळ त्यांच्या शौर्यासाठीच प्रसिद्ध नाहीत, तर ते सकल शास्त्रांचे अभ्यासक होते. तत्त्वज्ञान, राजनीति, संगीत, भाषाशास्त्र, बुद्धीचे वरदान आणि वक्तृत्वकला इ या सर्व गुणांमध्ये ते पारंगत होते.

आजकाल आपण मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी वेगवेगळ्या वर्गांना प्रवेश देतो. मात्र, जर पालकांनी मुलांना हनुमानाचे चरित्र वाचायला दिले, तर त्यांच्या कायार्तून व विचारांमधून मुलांचा व्यक्तिमत्व विकास नक्कीच घडू शकतो. उदाहरणच द्यायचे राहिले तर रामायणातील एक प्रेरणादायी प्रसंग सांगू शकतो. भगवान श्रीराम सीतेचा शोध घेत असताना ऋष्यमूक पर्वताजवळ आले. त्या वेळी पर्वतावर असलेल्या सुग्रीवाने त्यांना पाहिले आणि त्याला वाटले की वालीनेच त्यांना आपल्याला मारण्यासाठी पाठवले आहे. म्हणूनच तो त्यांची पारख करण्यासाठी हनुमंताला पाठवतो.

हनुमंत ब्राह्मणाचा वेष धारण करून श्रीराम आणि लक्ष्मण यांच्याकडे जातो. वेदशास्त्रसंपन्न असलेला हनुमंत आपल्या संभाषण चातुर्याने राम लक्ष्मणाचा परिचय जाणून घेतो. अतिशय आदराने त्यांचे मनोगत जाणून घेतो . आणि संपूर्ण खात्री झाल्यावरच आपले खरे रूप प्रकट करतो. आणि रामाच्या चरणी नतमस्तक होतो. श्रीरामानी मात्र त्याला केव्हाच ओळखले असते. दूत म्हणून संवाद कसा साधावा याचा आदर्श हनुमंत दाखवतो. हनुमंताची राम भक्ती, समर्पण, चातुर्य, बुद्धिमत्ता, कौशल्य हे सगळं आत्मसात करायचे असेल तर हनुमानाला शरण जाऊया. उत्साहात आणि भक्ती भावात हनुमान जयंती साजरी करूया.

■ **सौ. रमा देशमुख,**
**नागपूर.**

## हनुमंताची दास्यभक्ती!

दास्यभक्तीचा उत्तुंग आदर्श म्हणजे हनुमंताची दास्यभक्ती! साक्षात भगवंताचे दास्य लाभलेल्या हनुमंताला कोणत्याही प्रकारच्या वैभवाची इच्छा नव्हती. इतकेच नव्हे, तर मोक्षप्राप्तीची सुद्धा इच्छा नव्हती. प्रभू श्रीरामांचे दास्य "रामदास्य" हेच त्यांचे वैभव होते.

हनुमंताचे जीवन स्वतःसाठी नव्हतेच. श्रीराम सेवा हेच त्यांचे जीवन होते. अतिप्रचंड शक्तिसंपन्न असूनही नम्रता हा त्यांचा स्थायीभाव होता. साक्षात प्रभू श्रीराम त्यांना मोक्ष देण्यास सिद्ध असतानाही युगानुयुगांच्या अंतापर्यंत श्रीरामांचा दास होऊन राहणेच हनुमंताने स्वीकारले होते. अशी हनुमंताची दास्यभक्ती अवर्णनीय आहे. त्यांचे संपूर्ण जीवन नम्रता आणि सेवाभावाचे उदाहरण आहे. शक्तीसोबतच भक्ती, बुद्धी आणि सेवाभावाचे प्रतीक म्हणजे श्री हनुमान! हे हनुमंता, तुज्या भक्तीच्या बळावर आमच्यात संकटांवर मात करण्याची ताकद निर्माण होऊ दे आणि तुज्यासारखी दास्यभक्तीची तळमळ आमच्यात निर्माण होण्यासाठी तूच आम्हाला सद्बुद्धी दे, अशी तुझ्या चरणी प्रार्थना आहे.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**

# बदलत्या ऋतूमध्ये डोळ्याची काळजी कशी घ्यावी?



उन्हाळ्यात तुमच्या त्वचेची आणि आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे असते. बदलत्या हवामानासोबत डोळ्यांतून आपोआप अश्रू येतात ही अनेक लोकांसाठी एक सामान्य समस्या आहे. असे कोणत्याही ऋतूत होऊ शकते.

आरोग्य खराब होण्याचे अनेक कारणे असू शकतात. तज्ञांच्या मते बदलत्या ऋतूमध्ये तुमच्या शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती वाढवणे गरजेचे असते.

ऋतू बदलताना, हवेत परागकण, धूळ किंवा बुरशीच्या कणांचे प्रमाण वाढते, ज्यामुळे डोळ्यांत जळजळ, खाज सुटणे आणि पाणी येणे असे प्रकार होतात. याशिवाय, या ॲलर्जीला ताप किंवा हंगामी ॲलर्जीक नेत्रश्लेष्मलाशोथ असे म्हणतात. थंड किंवा खूप कोरडी हवा डोळे कोरडे करू शकते. ज्यामुळे डोळ्यांना ओलावा देण्यासाठी शरीर जास्त प्रमाणात अश्रू निर्माण करते, ज्यामुळे असे दिसते की डोळ्यांतून आपोआप अश्रू येत आहेत.

जेव्हा आपण गरम ठिकाणाहून थंड ठिकाणी जातो (जसे की एअर कंडिशनरमधून बाहेर पडणे), तेव्हा डोळ्यांच्या पृष्ठभागावर परिणाम होतो आणि रिफ्लेक्स फाडणे होऊ शकते. बदलत्या ऋतूंमध्ये, बॅक्टेरिया किंवा विषाणूमुळे डोळ्यांमध्ये सौम्य संसर्ग होऊ शकतो, ज्यामुळे अश्रू येतात आणि जळजळ होते. नाक आणि डोळ्यांमध्ये (नासोलॅक्रिमल डक्ट) एक संबंध आहे आणि सर्दी दरम्यान ते ब्लॉक होऊ शकते किंवा प्रभावित होऊ शकते, ज्यामुळे डोळ्यांतून पाणी येऊ शकते.

उन्हाळ्यात व्हिटॅमिन ए युक्त आहार म्हणजे हिरव्या पालेभाज्या, अंड्यातील पिवळा गर, पपई, संत्रे इ. चे नियमित सेवन करावे. जर लहानग्यांच्या डोळ्यात नेहमी पाणी येत असेल किंवा तिरळेपणा जाणवत असेल तर नेत्रविकाररोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.


बाळाने ए-बी-सी-डी वाचण्यास सुरू केले की, डोळ्यांची नियमित तपासणी करावी. घराबाहेर पडताना डोळ्यांवर सनग्लासेस अत्यावश्यक आहे. कॉन्टॅक्ट लेन्स वापरत असाल तर हा वापर क्रमप्राप्तच आहे. अतिनिल किरणांपासून (अल्ट्राव्हॉयलेट रेंज) 99 ते 100 टक्के संरक्षण करणाऱ्या सनग्लासेस वापरण्यास प्राधान्य द्यावे. अन्यथा मोतीबिंदू अथवा मॅक्युलर डिजनरेशन सारखे डोळ्यांचे विकार उद्भवण्याची शक्यता वाढते. शिवाय सनग्लासेसमुळे धुळ आणि छोट्या किटकांपासून रक्षण होईल.

डोळ्यांनी धुसर दिसत असेल, काम करताना डोळ्यांवर ताण पडत असेल, फोकस करण्यास त्रास होत असेल, डोळे कोरडे होत असतील, डोळे लाल असतील तर डोळे तपासावे. कदाचित चष्मा लागू शकतो, नंबर बदलू शकतो किंवा कुठले अन्य विकार आहेत हे कळू शकते. त्यामुळे लवकरात लवकर उपचारास सुरुवात होऊन पुढील गुंतागुंत टाळता येते.

आहारही समतोल असावा. वजनावर नियंत्रण असले तर डोळ्यावर कमी दबाव येतो; म्हणून वजन नियंत्रणात असावे. धुम्रपान टाळावे, नियमित व्यायाम करावा, आणि मोठ्यांनी वषार्तून एकदा तर लहान्यांनी सहा ते आठ महिन्यातून एकदा डोळ्यांची तपासणी करावी. डोळे फार अमुल्य आहेत. डोळ्यांच्या आजारासोबत कुठलीही तडजोड करू नये. डोळ्यांची नियमित काळजी घ्या आणि दृष्टीचे रक्षण करा.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## महावीर हनुमान

बल त्याग स्वामी निष्ठेचे
प्रतिक रामभक्त हनुमान
गुध त्याचे अंगीकारता
आमचे जीवन बनते महान

सूर्यवंशी आमचे जवान
करेना बलाची उपासना
सांगा होतील साकार यांच्या
स्वप्नातील मनोकामना

इंटरनेटच्या व्यसनाने
करती वेळेची बरबादी
अशाने कशी होईल
तरूणाईची कार्यसिद्धी?

# फुले वाड्यातून क्रांतीचं पाणी पेटलं अन् सुरु झाली सामाजिक क्रांती : भुजबळ

**पुणे, नाशिक ।** ज्यावेळी दलित बहुजन समाजाला कुणी पिण्याचे पाणी देत नव्हते त्यावेळी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आपल्या विहिरीचे पाणी बहुजन समाजासाठी पिण्यासाठी उपलब्ध करून दिले. या ठिकाणी बाल संगोपन गृह सुरु केले. विधवा, परितक्त्या महिलांना आपल्या घरात स्थान दिले. त्यांच्या मुलांचे संगोपन केले. आज जे आपल्याला शक्य होऊ शकत नाही हे त्या काळात फुले दाम्पत्याने केले. याच फुले वाड्यातून क्रांतीच पाणी पेटलं आणि देशातील सामाजिक क्रांती सुरु झाली. आपल्या देशात छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्यक्रांती केली तर महात्मा फुले यांनी सामाजिक क्रांती केली, असे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केले.





क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून शुक्रवारी (दि. १२) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्यावतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समग्र वाड्मयाचे पुनर्मुद्रित पुस्तकांचे वितरण छगन भुजबळ व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या प्रारंभी ना. पाटील आणि भुजबळ यांनी महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत विनम्र अभिवादन केले. यावेळी आमदार हेमंत रासने, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ प्रकाश बच्छाव, 'फुले' चित्रपटात महात्मा फुलेंची भूमिका केलेले कलाकार प्रतिक गांधी, दिग्दर्शक अनंत महादेवन, निर्मात्या अनुया चौहान कुडेचा, सहनिर्माते रोहन गोडांबे, महात्मा जोतीराव फुले चरित्र साधन प्रकाशन समितीचे सर्व सदस्य, प्रा. दिवाकर गमे, प्रितेश गवळी, मंजिरी धाडगे, डॉ.स्नेहा सोनकाटे, यश बोरावके, योगेश पिंगळे, पंढरीनाथ बनकर, सपना माळी, अविनाश चौरे, वैष्णवी सातव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी भुजबळ म्हणाले की, अनेक दिवसांपासून उपलब्ध नसलेले महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या समग्र वाड्मयाचे पुनर्मुद्रण होऊन हे साहित्य उपलब्ध झाले आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. हे ग्रंथ प्रत्येकी ५० रुपये या सवलतीच्या दरात वाचकांसाठी उपलब्ध झाले आहे. या महापुरुषांचा इतिहास आपण विसरत चाललो आहोत. तो या साहित्यातून जिवंत राहतो आहे. महात्मा फुले यांचा लढा हा ब्राम्हणांच्या विरोधात नाही तर ब्राह्मण्यवादाच्या अंधश्रद्धेच्या विरोधात होता. सामाजिक क्रांतीची सुरुवात या वाड्यातून झाली आहे. त्यामुळे ही जागा आपल्या सगळ्यांसाठी ऊर्जा केंद्र असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, सन १९९१ साली शरद पवार यांनी प्रथमतः या साहित्याची शासनामार्फत छपाई करून नाममात्र दहा रुपयात हे समग्र वाड्मय उपलब्ध करून दिले होते. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने देशभरात हे साहित्य आपण पोहोचविले. त्यानंतर बराच कालावधीपासून हे समग्र वाड्मय छापले गेलेले नव्हते. त्यानंतर या खात्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केवळ पन्नास रुपयात समग्र वाड्मय उपलब्ध करून दिली आहे. आज हे साहित्य वितरित करताना विशेष आनंद होत आहे. खरंतर महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी निर्माण केलेलं साहित्य आजही आपल्या समाजाच्या विकासासाठी तितकेच महत्वपूर्ण आहे असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, महात्मा फुले यांच्यावर मराठीत सत्यशोधक चित्रपट प्रकाशित झाल्यानंतर त्यांचे हे कार्य जगभरात पोहोचविण्यासाठी आता हिंदी भाषेत 'फुले' हा चित्रपट येत आहे. या चित्रपटाबद्दल काही वाद निर्माण केले जात आहे. खरतर मी त्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांशी चर्चा केली. त्यांनी जे पुरावे आहेत त्याच्या माध्यमातून त्यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. त्यामुळे कुठलेही वाद निर्माण होऊ न देता फुले दाम्पत्याचा हा इतिहास जगासमोर येउद्या असे आवाहन त्यांनी केले.

# करवीर बजरंगी... जय जय जय जय हनुमान...





पंचवटीतील पंचमुखी हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा होत असून, या निमित्ताने मंदिर प्रशासनातर्फे दर्शनासाठी येणाऱ्या हनुमान भक्तांसाठी २१०० किलो मोतीचुर बुंदीचे लाडू बनविण्यात आले आहे.
(छाया : सोज्जळ साळी, नाशिक)



# नासाका माध्यमिक विद्यालयात महात्मा फुले यांना अभिवादन




नासाका विद्यालयात महात्मा फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करताना मुख्याध्यापक अरुण पगार, चंद्रकांत खानकरी यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी.

**नाशिकरोड ।** पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील विद्यालयात थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

नासाका माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण पगार, आदर्श प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक चंद्रकांत खानकरी, विद्यार्थी आणि शिक्षक-कर्मचारी यांच्या उपस्थितीत महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनी महात्मा फुले यांच्या समाज सुधारणा आणि स्त्री शिक्षणाच्या महनीय कार्याला उजाळा दिला. विद्यालयातील विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### इंटरनॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत 'आदर्श'च्या विद्यार्थ्यांचे सुयश

**नाशिक ।** वणी येथील मविप्रच्या आदर्श इंग्लिश मिडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी एज्यूनो इंटरनॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत सुयश मिळविले. या स्पर्धेत शाळेतील एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यातील ६ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळविले. ४ विद्यार्थ्यांनी रौप्यपदक व २ विद्यार्थ्यांनी कास्यपदक मिळविले. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना सहशिक्षिका कु. डिंपल गांगुर्डे यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापिका एस. डी.काळे यांनी विद्यार्थ्यांना पदके देऊन सन्मानित केले. मविप्रचे सर्व पदाधिकारी, पेठ-दिंडोरी संचालक प्रविण जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. के. एस. शिंदे, मुख्याध्यापिका एस. डी.काळे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### मेघवाळ समाजातर्फे महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

**नाशिक ।** येथील मेघवाळ समाजच्यावतीने महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती डॉ.आंबेडकर कॉलनी, संत वीर मेघमाया चौक, रेडक्रॉस, नाशिक येथे मोठ्या उत्साहात



साजरी करण्यात आली.या प्रसंगी महात्मा फुले यांच्या पुतळ्यास संघर्ष समितीचे नेते सुरेश मारू यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी सुरेश मारू यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, फुले दाम्पत्यांनी मान,अपमान सहन करून देशामध्ये शिक्षणारची मुहूर्तमेढ राबविण्याचे काम फुले दांपत्यांनी केले. यामुळे देशामध्ये आज शिक्षणाचे जे जाळे उभे आहे ते यांच्यामुळेच. आज दलित, महिला, अप्लसंख्य समाजातील लोकांना जे शिक्षण मिळत आहे, शिक्षणामुळे प्रगती होत हे महात्मा ज्योतिबा फुले यांच्यामुळेच झालेले आहे अन्यथा हा वर्ग आजही अशिक्षित राहिला असता असे सांगितले. या प्रसंगी संघर्ष समितीचे जयसिंगभाई मकवाना, गोपाळ गिलातर, रतिश मारू, नरेश सुमरा, भरत बोरीचा, हेतल राठोड, यमुना बारिया, अनिताबेन राठोड, श्रीकांत बाबरिया, जितू मारू, मनोज मकवाना, देवेन मारू, आनंद चव्हाण, चेतन मारू, दिनेश चव्हाण, राहुल मारू, हरीश मारू, निलेश धारिया, हर्षद पडाया, वीरेन मारू, पंकज परमार आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

# बारावीपर्यंत मराठी विषय अनिवार्य करा

## मराठी विषय महासंघाचे जिल्हाधिकारी यांना निवेदन



निवासी जिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना निवेदन देतांना मराठी विषय महासंघाचे पदाधिकारी.

**नाशिक ।** दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी पारित झालेल्या 'महाराष्ट्रामध्ये बारावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा करण्याबाबतच्या शासनादेशाची अंमलबजावणी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून करावी, अशा मागणीचे निवेदन मराठी विषय महासंघाने निवासी जिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना दिले.

याप्रसंगी महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. चांगदेव खोले, उपाध्यक्ष प्रा. विनोद पवार, उपाध्यक्ष प्रा. चंदर बोरसे, सल्लागार प्रा. सविता सोनवणे, सहखजिनदार प्रा. वंदना रायते, इगतपुरी तालुका प्रतिनिधी प्रा.अर्चना पाटील आदी प्रतिनिधी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, आक्टोबर महिन्यात केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा दिला आहे. १३ सप्टेंबर २०२४ रोजी राज्य शासनाने मराठी विषय इयत्ता बारावीपर्यंत सक्तीचा केलेला आहे; परंतु मराठी भाषा ही सर्व विद्या शाखेत अनिवार्य करून शासन आदेशाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून करावी, यासाठी राज्य महासंघाचे अध्यक्ष सुनील डिसले, कार्याध्यक्ष मनीषा रिठे, सचिव बाळासाहेब माने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष प्रा. चांगदेव खोले,उपाध्यक्ष प्रा. विनोद पवार, प्रा.चंदर बोरसे यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे आणि मराठी भाषा उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

# राज्य स्पर्धेत खेळाडू चांगली कामगिरी करतील असा विश्वास : दीपक निकम

## लॅक्रॉस या खेळाची जिल्हा निवड चाचणी उत्साहात



**नाशिक ।** नाशिक जिल्हा लॅक्रॉस असोसिएशनच्या वतीने आयोजीत जिल्हा निवड चाचणी मोठ्या उत्साहाने पार पडली. या निवड चाचणीमध्ये सब. सबज्युनिअर, ज्युनिअर आणि सीनियर या तीन गटांचा समावेश होता.

जागतिक ऑलिंपिक संघटनेने लॅक्रॉस या खेळाचा समावेश २०२८ मध्ये लॉस एंजलिस, कॅलिफोर्निया युनायटेड स्टेट्स येथे होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत केला आहे. खेळाडुंना या खेळाची सखोल माहिती मिळावी यासाठी नाशिक येथे गेल्या पाच - सहा महिन्यांपासून प्रयत्न केले जात आहेत. या खेळामध्ये जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, खेळाडूना योग्य संधी मिळावी यासाठी लॅक्रॉस असोसिएशन ऑफ नाशिकच्यावतीने या खेळाचे साहित्य खेळाडुंना उपलब्ध करून दिले आहे. याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी (दि. ११) विभागीय क्रीडा संकुल येथे जिल्हा संघांची निवड करण्यासाठी निवड चाचणी आयोजीत करण्यात आली. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील १०६ खेळाडूंनी सहभाग घेतला.

# वन्यजीव, पक्ष्यांसाठी बांधले दोन दगडी बांध, पाणवठे

## शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**नाशिक ।** शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेने वन्यजीव आणि पक्ष्यांसाठी दगडी बांध आणि पाणवठे श्रमदानाने तयार करून स्तुत्य उपक्रम राबविला. संस्थेची 206 वी दुर्गसंवर्धन मोहीम (दि 6 एप्रिल 2025 रोजी) झाली. या मोहिमेत हा उपक्रम राबविण्यात आला.

उष्णता वाढली असताना तहानलेल्या वन्यजीव पक्षांसाठी, पाळीव प्राण्यांसाठी दिवसभर भर उन्हात राबून दुर्गसंवर्धकानी त्र्यंबक तालुक्यातील जव्हार घाटातील अंबई परिसरातील वाधविहीर नदीच्या घळीत दोन 12 फूट लांबीचे 2. 5 फूट रुंदीचे 2 दगडी बांध रचले. दरम्यान, मोहिमेच्या अखेरीस अंबई येथील शेतात आसलेल्या प्राचीन बारवेचा गाळ काढल्याबद्दल स्थानिक शेतकरी बंधू रमेश भूरबुडे व मंगा भूरबुडे, यां दोन शेतकऱ्यांनी श्रमदानात सहभाग घेतला. त्यांबद्दल शिवकार्य गडकोटवतीने वस्त्र, शाल, टोपी देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. गेल्या 25 वर्षांहून अधिक काळापासून नाशिकच्या गडकिल्यांच्या संवर्धनात राबणाऱ्या शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेने दरवर्षी घाट जंगलातील घळीत तहानलेल्या वन्यजीव पक्षांसाठी पाणवठे निर्माण केले आहे,




यावर्षीही या मोहिमेच्या प्रारंभी जव्हार घाटातील त्र्यंबक तालुक्यातील अंबई शिवारात दिवसभरात श्रमदान करुन वाघविहीर नदीच्या नैसर्गिक क्षेत्रात दोन दगडी बांघ व प्रशस्त पाणवठा सकारण्यात आला. यापुढे ही हरसूल व जव्हार घाटात तहानलेल्या वन्यजीव प्राण्यांसाठी डोगर घळीत झिरे तयार केले जातील, अशी माहिती यावेळी उपस्थित दुर्गसेवक यांना देण्यात आली. या मोहिमेत शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेचे संस्थापक तथा जल व दुर्गअभ्यासक राम खुर्दळ, उपाध्यक्ष भूषण औटे, संघटन सचिव तथा माजी सैनिक संजय झारोळे, सांस्कृतिक प्रचार प्रमुख दत्ता कांबळे, सनी शेवाळे, दुर्गसेवक राज धनगर, संघटक प्रमोद पवार, शेतकरी बंधू मंगा मुरबुडे रमेश भुरबुडे, दुर्गेश सोनवणे, संस्थेचे चिटणीस किरण माळी, विनायक पवार, आदित्य उज्वल, उपस्थित होते.

त्र्यंबक तालुक्यातील अंबई येथील प्राचीन बारवेचे जतन करणारे बारवेचा गाळ काढून तिचे बुजलेले स्त्रोत जिवंत करणारे शेतकरी बंधू रमेश भुरबुडे, व मंगा भुरबुडे यांना शिवकार्य वतीने वस्त्र देऊन सन्मानित करण्यात आले, ही जल संवर्धन मोहीम अशीच कायम असेल, असे संस्थेचे संस्थापक राम खुर्दळ यांनी सांगितले.

सध्या हवामानात कमालीचे बदल झाले आहेत, वाढती उष्णता, नैसर्गिक संकटे, वाढते वणवे, डोंगरफोडून सर्रास वाढलेली लाकूडतोड, यामुळे वन्यजीव व पक्षांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. जंगल, डोंगररांगेत मानवी हस्तक्षेपामुळे नैसर्गिक संकटे वाढली आहेत.

गाफिल समाज, असुरक्षित जल, जमीन, जंगल, डोंगर, वन्यजीव व पक्षी यांच्यावर अरिष्ट वाढले आहे, यातून मार्ग काढायचा म्हणून वन्यजीव व पक्षांसाठी शिवकार्य गडकोट संवर्धन संस्था दरवर्षी हरसूल जव्हार घाटात पाणवठे तयार करीत असते, यावेळी तर संस्थेने अंबईच्या शिवारात दोन दगडी बांध व एक मोठा पाणवठा तयार केला.

# बालांगण



# लिंग बदलणारे रिबन ईल

अद्भूत

निसर्ग नानाविध रहस्यांनी भरलेला आहे. तो असंख्य आणि अद्वितीय प्राण्यांचे घरही आहे. चला तर, आज अशाच वयानुसार लिंग बदलणाऱ्या एका जीवांविषयी जाणून घेऊ या.

मित्रांनो, रिबन ईल हा समुद्री जलचर नर म्हणून जन्माला येतो आणि नंतर मादीमध्ये रूपांतरित होतो. ही अनोखी प्रक्रिया सागरी जगात खास मानली जाते. मुलांनो, रिबन ईल हा एक सुंदर समुद्री जीव असून तो सामान्य ईल माशापेक्षा वेगळा आहे. ते प्रामुख्याने हिंदी महासागर आणि प्रशांत महासागराच्या उबदार पाण्याच्या भागात आढळतात. त्याचे शरीर लांब आणि पातळ म्हणजेच एखाद्या रिबनसारखे दिसते. म्हणून त्याला 'रिबन ईल' म्हणतात. सर्वात वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा चमकदार रंग. हा रंग वयानुसार बदलत राहतो. ते सहसा खडकांमध्ये आणि प्रवाळ खडकांमध्ये लपतात आणि लहान मासे आणि समुद्री कीटक खाऊन पोट भरतात.

रिबन ईलचे आयुष्य तीन टप्प्यात विभागले गेले असून यामध्ये त्याचा रंग आणि लिंग दोन्ही बदलते. म्हणजेच रिबन ईल तरुण असताना रंग पूर्णपणे काळा असतो. मात्र मोठा होतो तेव्हा त्याचा रंग गडद निळा होतो आणि तो पूर्ण नर बनतो. या टप्प्यात तो पुनरुत्पादनासाठी तयार असतो. हेच रिबन ईल मोठे होतात तसतसे त्यांचे शरीर पिवळे होते. आता ते मादीमध्ये रूपांतरित होतात आणि अंडी घालण्यास सज्ज होतात. म्हणजेच, प्रत्येक रिबन ईल नर आता मादी म्हणून आपले जीवन सुरू करतो.

रिबन ईल मासा त्याचे लिंग का बदलतो, हे जाणून घेऊ या. निसर्गातील काही जीवांमध्ये सिक्वेन्शियल हर्माफ्रोडिटिझम नावाची प्रक्रिया असते, ज्यामध्ये जीव त्यांचे लिंग बदलू शकतात. रिबन ईलच्या बाबतीत बघायचे तर समुद्रात यांच्या माद्या खूप कमी असतात. म्हणून नर ईल मोठ्या वयात पोहोचतो तेव्हा तो स्वतःला मादीमध्ये रूपांतरित करतो आणि यातूनच त्यांची प्रजनन प्रक्रिया सुरू राहू शकते. थोडक्यात, यामुळेच त्यांची संख्या अबाधित राहते आणि अस्तित्व धोक्यात येत नाही.

रिबन ईल जवळपास २० वर्षांपर्यंत जगतात. ते इतके लवचिक असतात की अगदी लहान छिद्रांमधूनही जाऊ शकते. पाण्याखाली राहूनही त्याच्यात वास घेण्याची अद्भुत क्षमता असते. त्याचमुळेच ते दूरवरची शिकार शोधू शकतात. त्याची जीभ सापाच्या जिभेसारखी दोन भागात विभागलेली असते. काही लोक त्यांना मत्स्यालयात देखील ठेवतात, परंतु इथे त्यांची काळजी घेणे खूप कठीण असते.

# साबणाचा शोध लागला कधी?



जाणून घ्या

आपल्या रोजच्या वापरात असणाऱ्या साबणाचा शोध कधी आणि कसा लागला हे तुम्हाला माहिती आहे का? छोट्या दोस्तांनो, साबणाच्या शोधाबद्दल अनेक कथा आहेत. परंतु सर्वात लोकप्रिय कथा प्राचीन रोमशी संबंधित आहे. असे म्हटले जाते की, रोमजवळ 'सापो' नावाची एक टेकडी होती. तिथे प्राण्यांची चरबी आणि लाकडाची राख यांच्या मिश्रणातून एक फेसयुक्त पदार्थ तयार होऊन नदीत वाहून येत असे. लोक या नदीच्या पाण्याने कपडे धुवायचे तेव्हा कपड्यांवरील डाग वा घाण सहजपणे निघून जात असल्याचे त्यांना जाणवले. म्हणजेच हा फेसयुक्त पदार्थ साबणाचा सर्वात जुना प्रकार होता. तेव्हा 'साबण' हा शब्दही या टेकडीच्या नावावरून आला असल्याचे समजले जाते.

इ.स.पू. २८०० मध्ये साबणाचा पहिला उल्लेख मेसोपोटेमियन संस्कृतीत आढळतो. तेव्हा प्राण्यांची चरबी आणि लाकडाची राख मिसळून साबण तयार केले जात असल्याचे सांगितले जाते. पुढे इ.स.पू. १५०० काळात प्राचीन इजिप्शियन लोकदेखील साबणासारखा पदार्थ वापरत असत. ते ऑलिव्ह ऑइल, प्राण्यांची चरबी आणि अल्कधर्मी पदार्थांपासून साबण बनवत असत. पुढे रोममध्ये पहिल्या शतकात आंघोळीसाठी लोक साबण वापरू लागले. प्राचीन भारतीय आणि चिनी संस्कृतींमध्येही हर्बल घटकांपासून बनवलेल्या साबणासारख्या गोष्टी वापरल्या जात होत्या. आयुर्वेदात स्वच्छतेसाठी नैसर्गिक घटकांचाही उल्लेख आहे.

मध्ययुगात, युरोपमध्ये स्वच्छतेचे महत्त्व कमी झाले आणि त्यामुळे अनेक रोगांचा प्रसार झाला. पण १२ व्या शतकात अरब शास्त्रज्ञांनी साबण बनवण्याच्या पद्धतीत आणखी सुधारणा केली.

त्यांनी ऑलिव्ह ऑइल आणि सुगंधी पदार्थांपासून उच्च दर्जाचे साबण बनवले जे नंतर युरोपमध्येही लोकप्रिय झाले. साबणाचे औद्योगिक उत्पादन १७ व्या आणि १८ व्या शतकात सुरू झाले. १९ व्या शतकात साबणाचा वापर झपाट्याने वाढला. हळूहळू शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारचे साबण तयार केले. आज आपल्याकडे अनेक प्रकारचे साबण उपलब्ध आहेत. ते आपण शारीरिक स्वच्छतेबरोबरच संसर्ग दूर करण्यासाठी, त्वचेची चमक टिकवण्यासाठी आणि त्वचा सुगंधी ठेवण्यासाठी वापरतो.

# हे करून बघा

अॅप वर्ल्ड

Google Files

युजर्स व्हॉट्स अॅपवर स्टेटस अपलोड करतात. तुम्हीही तुमचे फोटो, व्हिडिओ तसंच संदेश स्टेटसमध्ये अपलोड करत असाल. काही स्टेटस खूप आकर्षक असतात. एखादं स्टेटस छानसा संदेश देऊन जातं. हा संदेश आपल्याकडे असायला हवा, असंही वाटून जातं. कोणी गमतीशीर व्हिडिओ अपलोड करतं. आपण अनेकांची स्टेटस बघतो. स्टेटसमधले फोटो, व्हिडिओ सेव्ह करता येत नाहीत, असा आपला समज असतो. पण प्रत्यक्षात आपण बघितलेले फोटो आणि व्हिडिओ ऑटो डाउनलोड होऊन सेव्ह होतात. ते नेमके कुठे सेव्ह होतात हे आपल्याला कळत नाही. ते भलत्याच फोल्डरमध्ये जाऊन बसतात. तेव्हा ऑटो सेव्ह झालेले फोटो आणि व्हिडिओ कसे बघायचे याविषयी...

फोनमध्ये 'गुगल फाईल्स' अॅप डाउनलोड करून घ्या. यानंतर अॅपच्या डाव्या बाजूला सेटिंग ऑप्शन दिलेला असेल. त्यावर टॅप करून 'शो हिडन फाईल्स' हा पर्याय ऑन करा. यानंतर व्हॉट्स अॅपवरच्या स्टेटसमध्ये फोटो आणि व्हिडिओ बघा. यानंतर 'गुगल फाईल्स' ओपन करून व्हॉट्स अॅप फोल्डरमध्ये जा. मग मीडियामध्ये 'स्टेटसेस' हा ऑप्शन असेल. तिथे तुम्हाला स्टेटसमधले व्हिडिओ आणि फोटो दिसतील. तुमच्या आवडीचे व्हिडिओ, फोटो दुसऱ्या फोल्डरमध्ये सेव्ह करता येतील.




## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) काश्मीरमधली प्रसिद्ध पश्मिना शाल कोणत्या प्राण्याच्या केसांपासून तयार केली जाते?
२) एशियान संघटनेचं मुख्यालय कुठे आहे?
३) भारत संयुक्त राष्ट्रांचा सदस्य कोणत्या वर्षी झाला?
४) जागतिक बँकेची स्थापना कोणत्या वर्षी झाली?
५) नाटोचं मुख्यालय कुठे आहे?
६) युनेस्कोचं मुख्यालय कुठे आहे?
७) जपानचा राष्ट्रीय खेळ कोणता?
८) होपमन कप कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
९) पहिला क्रिकेट कसोटी सामना कोणत्या वर्षी खेळवण्यात आला?
१०) भारताच्या कसोटी संघाचे पहिले कर्णधार कोण?

उत्तर : १) बकरी २) जकार्ता ३) १९४५ ४) १९४४ ५) ब्रुसेल्स ६) पॅरिस ७) सुमो रेसलिंग ८) लॉन टेनिस ९) १८७७ १०) सी.के नायडू


# बर्फाचा गोळा खाताय?

धोका ओळखा

दोस्तांनो, आता उन्हाळा चांगलाच जाणवू लागला आहे. या दिवसांमध्ये बर्फाचा गारेगार गोळा, थंड सरबते किंवा कुल्फी सारखे थंड पदार्थ खाताना भारी मजा येते ना... तुम्हीही बर्फाच्या गोळ्यासाठी हट्ट करत असाल. पण स्लशी म्हणजेच बर्फाचा गोळा खाणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते, हे तुम्हाला माहिती आहे का? अलिकडच्या एका अभ्यासातून दिसून आले आहे की स्लशीमध्ये असणारे ग्लिसरॉल मुलांमध्ये गंभीर आजार निर्माण करू शकते. म्हणूनच गोळा खात असाल तर काळजी घ्या.

गोळ्यामध्ये बर्फाचा चुरा, सरबत किंवा रस मिसळला जात असल्यामुळे तो थंड, चविष्ट आणि खूप चटपटीत लागतो. मात्र यातील ग्लिसरॉलमुळे मुलांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होणे (हायपोग्लायसेमिया) आणि चेतना गमावणे यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. म्हणजेच स्लशी प्यायल्याने काही आजार होऊ शकतात. सरबते तयार करण्यासाठी वापरलेले पाणी वा बर्फ खाण्या-पिण्यायोग्य नसल्यास विषबाधा होण्याचा मोठा धोकाही असतो. या अभ्यासात असेही आढळून आले की, आरोग्यास घातक असणारा बर्फगोळा खाल्ल्यामुळे अनेक मुलांना रुग्णालयात दाखल करावे लागते. त्यांना न्यूरोइमेजिंग, फेफरे आणि इतर त्रासावर बराच काळ उपचार घ्यावे लागतात. त्यामुळेच हा धोका टाळण्यासाठी बर्फाचा गोळा खात्रीशीर आणि स्वच्छतेचे निकष पाळणाऱ्या ठिकाणीच खावा.महत्त्वाचे म्हणजे स्लशीमध्ये ग्लिसरॉलचे प्रमाण वेगवेगळे असते. त्यामुळेच मुलांसाठी कोणते प्रमाण सुरक्षित आहे याचा अंदाज लावणे कठीण आहे. म्हणूनच रस्त्यावरील विक्रेत्याकडून बर्फाचा गोळा घेणे टाळा. त्याऐवजी उसाचा ताजा रस किंवा थंडगार ताक, लस्सी, थंडावा देणारी फळे खाणे चांगले. त्यातही एखाद्या वेळी गाडीवर मिळणारा गोळा वा सरबत प्यायले आणि काही त्रास जाणवू लागला तर तातडीने आई-बाबांना सांगा. ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधला तर वेळीच उपचार होतील आणि पुढचा धोका टळेल.






# गुदगुल्या का होतात?



असं का होतं?

तुम्हाला अचानक एखाद्याने गुदगुल्या केल्या तर काय होतं? एकतर तुम्ही खूप हसता, जमिनीवर लोळता आणि स्वतःला वाचवण्यासाठी इकडे तिकडे पळता... बरोबर ना? पण तेच तुम्ही स्वतःला गुदगुल्या केल्या तर काय होतं बरं? काहीही होत नाही ना? असं का होतं... चला, जाणून घेऊ या.

मुलांनो, मेंदू इतका तीक्ष्ण आणि बुद्धिमान आहे की तो आपल्या सगळ्या कृती ओळखतो. म्हणूनच तुम्ही स्वतःला गुदगुल्या करण्याचा प्रयत्न करता तेव्हा मेंदूला आधीच काय करणार आहात हे माहिती असते. म्हणूनच शरीराला हा स्पर्श विचित्र वाटत नाही किंवा ते कोणतीही मजेदार प्रतिक्रियाही निर्माण करत नाही. दुसरीकडे, कोणी तुम्हाला गुदगुल्या करते तेव्हा मात्र मेंदू या स्पर्शाचा अंदाज घेऊ शकत नाही. त्यांच्यासाठी ही एक आश्चर्यचकित करणारी घटना ठरते आणि त्यामुळेच शरीर लगेच प्रतिक्रिया देते. तुम्ही हसायला सुरुवात करता.

सेरेबेलम हा मेंदूचा मुख्य नियंत्रक आहे. आपल्या मेंदूचा हा विशेष भाग शरीराच्या हालचालींवर नियंत्रण ठेवत असतो आणि तोच या संपूर्ण खेळाचा सूत्रधारही असतो. आपण स्वतःला गुदगुल्या करतो तेव्हा हा स्पर्श आपली स्वतःचीच क्रिया असल्याचे जाणतो आणि शरीर त्यावर थंड प्रतिक्रिया देते. परंतु कोणीतरी आपल्याला गुदगुल्या केल्यास तो एक नवीन अनुभव असतो. मग याला शरीराकडून लगेचच प्रतिक्रिया मिळते. याच कारणामुळे तुम्ही स्वतःला हाताने मारण्याचा प्रयत्न केला तर जास्त दुखापत होत नाही, परंतु दुसऱ्याने तसाच फटका मारला तर जास्त वेदना होतात.

मित्रांनो, गुदगुल्या करणे हा केवळ मनोरंजनाचा नाही तर आपल्या शरीराच्या सुरक्षाप्रणालीचाही एक भाग आहे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया आपल्या पूर्वजांच्या काळातच विकसित झाली. तेव्हा मानव जंगलात राहायचा. त्यामुळे शरीराच्या संवेदनशील भागांचे संरक्षण करण्यासाठी याचा वापर केला जायचा. गुदगुल्या सहसा शरीराच्या संवेदनशील आणि असुरक्षित भागांमध्ये जाणवतात. जसे की मान, पोट आणि काखेमध्ये कोणी स्पर्श केल्यास गुदगुल्या होतात. कोणी आपल्याला गुदगुल्या केल्या तर मेंदूकडे हा भाग सुरक्षित नसल्याचा संदेश जातो आणि तात्काळ शरीर आपल्याला हालचाल करण्यास किंवा मागे हटण्यास भाग पाडते. त्यामुळेच गुदगुल्या सहन झाल्या नाहीत तर आपण त्या करणाऱ्या व्यक्तीला मारतो. ढकलतो आणि स्वतःची सुटका करुन घेतो. आता कळले का गुदगुल्या होण्यामागचे गुपीत?

# झुरळ नव्हे हा तर रोबो



टेक फन


अमेरिकन शास्त्रज्ञांनी झुरळाच्या आकाराचा रोबो तयार केला आहे. हा रोबो जमिनीवर झुरळाप्रमाणेच तुरुतुरु चालतो. तो इतका बळकट आहे की माणसाचा पाय पडल्यावरही तुटणार नाही. नैसर्गिक आपत्तींमध्ये मदतकार्यासाठी या छोट्याशा रोबोचा वापर करता येईल, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. काही दुर्गम प्रदेशांमध्ये माणूस, जनावरं आणि उपकरणं पोहचू शकत नाहीत. अशा ठिकाणी हा रोबो पोहचू शकेल.

एवढ्या छोट्या आकाराचे रोबो सर्वसाधारणपणे खूप नाजूक असतात. माणसाचा पाय पडल्यावर तुटून जातात. त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. मात्र या रोबोच्या बाबतीत असं काहीच होणार नाही. याबाबतची चाचणीही शास्त्रज्ञांनी घेतली आहे. या रोबोवर माणसएवढं वजन ठेवण्यात आलं. पण रोबो तुटला नाही किंवा त्यात कोणताही बिघाड झाला नाही.

भूकंपानंतर उपकरणं किंवा कुत्र्यांच्या मदतीने ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांचा शोध घेताना बऱ्याच अडचणी येतात. म्हणूनच असे छोट्या आकाराचे रोबो तयार केले जातात. हे रोबो ढिगाऱ्याखालच्या माणसांचा शोध घेऊ शकतात. यामुळे अनेकांचा वाचवता येऊ शकतं. या रोबोचं वजन खूपच कमी आहे. मात्र तो ६० किलो वजन अगदी सहज उचलू शकतो. तो स्वतंत्रपणे काम करू शकतो. आता यामध्ये गॅस सेन्सर्सही बसवण्यात येणार आहेत.

## दोस्त हे मस्त

### हे तर निसर्गदूत



प्राणी, पक्षी निसर्गाच्या खूप जवळ असतात. निसर्गातल्या बदलांबाबत त्यांच्याकडून सूचना मिळू शकतात. या मुक्या जीवांना सगळ्यात आधी नैसर्गिक आपत्तींची कुणकुण लागते. म्हणूनच त्यांच्या वागणुकीवरून आपण हवामानाचा अंदाजही बांधू शकतो. आता आपल्या सभोवताली दिसणाऱ्या पक्ष्यांचंच बघा. पक्षी आकाशात मुक्तपणे उडत असतील तर हवामान चांगलं राहणार असल्याचं समजावं. निरभ्र आकाशात पक्षी मोकळेपणाने विहार करतात. मात्र जमिनीलगत उडणारे पक्षी वातावरणातल्या बदलांची सूचना देतात. वादळ येणार असेल, जोरात वारे वाहणार असतील तर पक्षी जमिनीलगत उडू लागतात.

## खादाडी

### हेल्दी कोल्डड्रिंक



मुलांनो, या सुट्टीत तुम्हाला मस्तपैकी इलेक्ट्रिक सोडा बनवून पिता येईल. यासाठी एक लिंबू, तीन चमचे मध, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि चाट मसाला, सोड्याची एक बाटली, बर्फाचे तुकडे, आठ-दहा पुदिन्याची पानं हे साहित्य घ्या. आधी एक ग्लास घ्या. त्याच्या तळाची दोन चमचे लिंबाचा रस आणि मध घाला. त्यानंतर जिरेपूड आणि चाट मसाला घालून सर्व पदार्थ नीट एकत्र करा. आता ग्लासमध्ये सोडा घाला आणि चमच्याने ढवळून घ्या. त्यात बर्फाचे तुकडे आणि पुदिन्याची पानं घाला. मस्तपैकी प्या.

## स्टडी टिप्स

### सुट्टीत अभ्यास करताना...



मुलांनो, प्रत्येकाची अभ्यास करण्याची पद्धत वेगवेगळी असते. काहींना अधूनमधून विश्रांतीची गरज असते तर काही सलग दोन ते तीन तास अभ्यास करू शकतात. वाचलेलं नीट लक्षात ठेवण्यासाठी अभ्यास करण्याच्या पद्धतीत बदल करू नका. आपल्या नेहमीच्या पद्धतीने अभ्यास करणं जास्त चांगलं असल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. त्यामुळे तुम्ही तुमच्याच पद्धतीने अभ्यास करा.

## योगा टाईम

### अशी आहे वरुण मुद्रा



दोस्तांनो, विविध मुद्रांमुळे आरोग्याला लाभ होतात. अशीच एक लाभदायी मुद्रा म्हणजे वरुण मुद्रा. ही मुद्रा करताना करंगळी आणि अंगठ्याचा वरचा भाग एकमेकांना चिकटवा. उरलेली तीन बोटं सरळ ठेवा. ही मुद्रा तुम्ही कोणत्याही वेळी करू शकता. यामुळे शरीरातल्या जलतत्त्वाचं संतुलन साधलं जातं आणि विविध विकारांना आळा घालता येतो.



# सेन्सेक्स 1310 अंकांनी वधारला निफ्टी 22,850 वर बंद



**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

या महिन्याच्या सुरुवातीला लागू केलेल्या शुल्कांवर ट्रम्प यांनी ९० दिवसांची स्थगिती दिल्यानंतर आज शेअर बाजाराला मोठा धक्का बसला आहे. आजच्या व्यवहारात, सेन्सेक्स १३१० अंकांनी किंवा १.७७% ने वाढून ७५,१५७.२६ वर बंद झाला, तर निफ्टी ४५०.८५ अंकांनी किंवा २.०१% ने वाढून २२,८५० वर बंद झाला. आजच्या व्यवहारात, सर्व क्षेत्रीय निर्देशांक वाढून बंद झाले, तर निफ्टी मेटलमध्ये सर्वाधिक वाढ नोंदवण्या आली.

शुक्रवारीच्या व्यवहार सत्रात सर्वाधिक वाढ हिंडाल्कोच्या शेअर्समध्ये नोंदवण्यात आली. तो ६.४४% च्या मोठ्या वाढीसह ६००.३० रुपयांवर बंद झाला, तर टाटा स्टीलचे शेअर्स ४.९१% च्या चांगल्या मजबूतीसह १३३.४२ रुपयांवर बंद झाले. यानंतर, जेएसडब्ल्यू स्टीलचे शेअर्स ४.७३% वाढून ९९०.२५ च्या पातळीवर बंद झाले, तर कोल इंडियाचे शेअर्स ४.६८% वाढून ३९२.१० च्या पातळीवर बंद झाले. याशिवाय, जिओ फायनान्शियलचे शेअर्स ४.१२% वाढून २३०.०२ रुपयांवर बंद झाले.

आज निफ्टी ५० पॅकमधील फक्त तीन शेअर्समध्ये घसरण झाली. ज्यामध्ये अपोलो हॉस्पिटलचे शेअर्स ०.७८% ने घसरून ६७८१ रुपयांवर बंद झाले, तर एशियन पेंट्सचे शेअर्स ०.७३% ने घसरून २३९४ रुपयांवर बंद झाले. याशिवाय, टीसीएसचे शेअर्स ०.४७% ने घसरून ३२३२ रुपयांवर बंद झाले.

धातू क्षेत्रातील समभागांमध्ये मोठ्या प्रमाणात खरेदी झाल्यामुळे निफ्टी मेटल इंडेक्स आज वरच्या पातळीवर बंद झाला. त्यात ४.०९% ची नेत्रदीपक वाढ झाली आणि तो ८,१६८ च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी एनर्जी इंडेक्स २.७०% वाढून ३२,४११ वर बंद झाला. निफ्टी ऑटो २.०३% वाढून २०,५४९ वर बंद झाला. बँक निफ्टी १.५२% वाढीसह ५१,००२ च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी आयटी निर्देशांक ०.६९% वाढीसह ३२,७४१ वर बंद झाला.

**सेन्सेक्स 75,157**

**निफ्टी 22,850**

दरम्यान, सोन्याने आज आपला सर्वकालीन उच्चांक गाठला आहे. सोन्याच्या किमतीत सुमारे ₹२९९० ने वाढ झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या मते, २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ₹२,९१३ ने वाढून ₹९३,०७४ झाली आहे, जी पूर्वी ₹९०,१६१ होती. त्याच वेळी, आज एक किलो चांदीची किंमत ₹१,९५८ ने वाढून ₹९२,६२७ प्रति किलो झाली, जी पूर्वी ₹९०,६६९ प्रति किलो होती. २८ मार्च रोजी चांदीने १,००,९३४ रुपयांचा सर्वोच्च दर गाठला होता आणि ३ एप्रिल रोजी सोन्याने ९१,२०५ रुपयांचा सर्वोच्च दर गाठला होता.

मुंबईत २२ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ८७,४५० रुपये आणि २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ९५,४०० रुपये आहे.


# चीनची मोठी कारवाई; अमेरिकन वस्तूंवर आता 125 टक्के टॅरिफ

**बीजिंग, दि.११ वृत्तसंस्था**

अमेरिका आणि चीन या दोन बलाढ्य महासत्तांमधील टॅरिफ वॉर आता आणखी पेटत चालले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चिनी वस्तुंवरील टॅरिफ १४५ टक्क्यांपर्यंत वाढविल्यानंतर आता चीननेदेखील अमेरिकन वस्तुंवर १२५ टक्के कर लावण्याची घोषणा केली आहे.

दरम्यान, अमेरिकेने पुन्हा टॅरिफ वाढवले तरीदेखील आम्ही याहून अधिक टॅरिफ लावणार नाही, असेही चीनकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुढील निर्णयांकडे दुर्लक्ष करणार असल्याचेही चीनने म्हटले आहे. रॉयटरने याबाबतचे वृत्त दिले आहे.

चिनी अर्थमंत्रालयाने म्हटले आहे की, "अमेरिकेने चीनवर असामान्यरित्या अधिक टॅरिफ्स लावलेली आहेत. या टॅरिफ्समुळे आंतरराष्ट्रीय आंतरराष्ट्रीय



आर्थिक व्यापार नियमांचे उल्लंघन झालेले आहे. मूलभूत आर्थिक तत्त्वांचे आणि सामान्य समजुतींचेही उल्लंघन झालेले आहे. हे पूर्णपणे एकतर्फी आहे. ही दडपशाही आणि जबरदस्ती आहे."

मंत्रालयाने असेही म्हटले आहे की, "जर अमेरिका चीनच्या हितावर गंभीर हल्ले करत राहिली, तर आम्ही ठामपणे प्रतिकार करू आणि शेवटपर्यंत लढू."

तथापि, त्यांनी हेही स्पष्ट केलं की, जर अमेरिका पुढेही चिनी वस्तूंवर अतिरिक्त टॅरिफ लावत राहिली, तरी चीन याकडे दुर्लक्ष करेल आणि यापुढे कोणतीही प्रतिशोधात्मक पावले उचलणार नाही.

चीनकडून ही कारवाई व्हाईट हाऊसकडून चीनवर सातत्याने टाकल्या जाणाऱ्या दबावानंतर झाली आहे. चीन हा अमेरिकेचा सर्वात मोठा आयात भागीदार असल्यामुळे, त्याला विशेषतः अतिरिक्त टॅरिफच्या वाढीच्या निशाण्यावर ठेवण्यात आले आहे.

अमेरिका इतर देशांवरील टॅरिफ्स सुलभ करत आहे. सवलत देत आहे. पण, टॅरिफ्स वाढवून चीनला मात्र एकटे पाडण्याचा प्रयत्न अमेरिकेकडून केला जात आहे.

ट्रम्प यांनी टॅरिफला ९० दिवसांची स्थगिती दिली पण चीनला मात्र त्यातून वगळले.त्यामुळे चीनवर टॅरिफ सुरू झाले आहे. उलट चीनला आता १२५ % पर्यंत टॅरिफ्सचा सामना करावा लागणार आहे.

अमेरिकेच्या या टॅरिफ हल्ल्यांवर आपल्या पहिल्या प्रतिक्रियेत, चिनी राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी युरोपियन युनियनला आवाहन केले होते की, त्यांनी चीनसोबत हातमिळवणी करावी आणि या एकतर्फी दडपशाही विरोधात एकत्र उभे राहावे.

# प्रशांत कोरटकरची कळंबा कारागृहातून सुटका, पोलीस संरक्षणात बाहेर काढले

**कोल्हापूर, दि. ११ प्रतिनिधी**

राष्ट्रपुरुषांचा अवमान करून इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना मोबाइलवरून धमकावणारा प्रशांत मुरलीधर कोरटकर (रा.नागपूर) याची कळंबा कारागृहातून सुटका झाली. न्यायालयाने अटी-शर्तीसह ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर कोरटकरचा जामीन मंजूर केला होता. मात्र कागदपत्रांची पुर्तता न झाल्याने त्याचा कारागृहातील दोन दिवस मुक्काम वाढला होता. अखेर कडक पोलिस बंदोबस्तात कोरटकरला कारागृहातून बाहेर आणण्यात आले. यावेळी कारागृह परिसरात प्रचंड पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दुपारी २.१५ मिनिटांनी कोरटकरला कारागृहातील अंडासेल मधून बाहेर काढले. त्यानंतर न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार त्याला पोलिसाच्या स्वाधीन केले अशी माहिती कारागृहातील वरिष्ठ



अधीक्षक नागनाथ सावंत यांनी दिली. न्यायालयाने कोरटकरला बुधवारी (दि.९) जामीन मंजूर केला होता. मात्र, जामिनाचे पत्र कळंबा कारागृहात पोहोचू शकले नव्हते, त्यामुळे त्याची सुटका होऊ शकली नव्हती. कागदपत्रांची पूर्तता होताच आज, शुक्रवारी सुटका झाली. सुनावणीवेळी कोरटकरवर न्यायालय परिसरात हल्ल्याचा प्रयत्न झाला होता. त्यामुळे कडक पोलिस बंदोबस्तात त्याला कारागृहातून बाहेर काढले. कोरटकर याने २५ फेब्रुवारीच्या रात्री इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन करून छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केले होते. यानंतर तो फरार झाला होता. त्याला २५ मार्च रोजी अटक झाली. पाच दिवसांच्या पोलिस कोठडीनंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली होती. त्यानंतर, त्याने वकिलांमार्फत जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र, सरकारी वकील आणि फिर्यादींच्या वकिलांनी केलेल्या जोरदार युक्तिवादामुळे कोरटकरचा कोठडीतील मुक्काम वाढला होता. अखेर बुधवारी न्यायालयाने त्याचा जामीन मंजूर केला.

फिर्यादी आणि तपास अधिकाऱ्यांवर दबाव आणू नये. पुरावे नष्ट करू नयेत. चौकशीत पोलिसांना सहकार्य करावे. पोलिसांच्या परवानगीशिवाय बाहेरगावी जाऊ नये, अशा अटींचे पालन करण्याच्या सूचना त्याला न्यायाधीशांनी दिल्या आहेत.

# न्यायाधीशांविरुद्ध अपशब्द वापरल्याबद्दल वकिलाला 6 महिन्यांचा तुरुंगवास

**प्रयागराज, दि. ११ वृत्तसंस्था**

न्यायाधीशांविरुद्ध अपशब्द वापरल्याबद्दल अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका वकिलाला ६ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा आणि दोन हजार रुपये दंडही ठोठावला. न्यायमूर्ती विवेक चौधरी आणि न्यायमूर्ती ब्रिजराज सिंह यांनी संबंधित वकिलाला तीन वर्षांसाठी उच्च न्यायालयात प्रॅक्टिस करण्यापासून का रोखले जाऊ नये? असाही प्रश्न उपस्थित केला. याबाबत येत्या १ मे २०२५ रोजी सुनावणी होणार आहे. सुनावणीदरम्यान वकिलाने न्यायधीशांना गुंड म्हटले, असे सांगण्यात आले.

अशोक पांडे असे वकिलाचे नाव आहे. न्यायमूर्ती विवेक चौधरी आणि न्यायमूर्ती ब्रिज राज सिंह यांच्या खंडपीठाने वकील अशोक पांडे यांना न्यायालयाच्या फौजदारी अवमानाबद्दल दोषी ठरवले. २००३ ते २०१७ दरम्यान वकील अशोक यांनी केलेल्या गैरवर्तनाचे अनेक अहवाल आहेत. वकील अशोक यांच्या वागणुकीवरून असे दिसून येते की, ते जाणूनबुजून न्यायालयाच्या अधिकाराला कमी लेखत आहे आणि आपली चूक देखील मान्य करत नाहीत, असे न्यायालयाने म्हटले.

हे प्रकरण चार वर्षे जुने आहे. १८ ऑगस्ट २०२१ रोजी न्यायमूर्ती रितू राज अवस्थी आणि न्यायमूर्ती दिनेश कुमार सिंह यांच्या खंडपीठासमोर एका खटल्याची सुनावणी सुरू होती. त्यावेळी वकील अशोक पांडे खंडपीठासमोर गणवेशाएवजी सिव्हिल ड्रेसमध्ये होते आणि त्यांच्या शर्टची बटणेही उघडी होती. न्यायालयाने त्यांना गणवेश घालण्याचा सल्ला दिला. पण वकील अशोक यांनी नकार देत वाद घातला आणि कपड्यांबद्दल प्रश्न उपस्थित केले. एवढेच नाही तर, त्यांनी न्यायालयीन कामकाजातही अडथळा आणला आणि अपशब्द वापरले. तसेच न्यायाधीशांवर गुंडासारखे वागण्याचा आरोप केला.

न्यायालयाने असेही म्हटले आहे की, याआधीही वकील अशोक पांडे यांनी अनेकदा कोर्टात गैरवर्तन आणि अपशब्द वापरले. वकील अशोक पांडे यांनी आजपर्यंत त्यांच्यावरील आरोपांवर कोणतेही उत्तर दाखल केलेले नाही, त्यामुळे त्यांना दोषी ठरवून ६ महिन्यांची शिक्षा सुनावण्यात आली.

# बिहारमध्ये अवकाळी पावसाचा कहर

## एका दिवसात 65 जणांचा मृत्यू


**पाटणा, दि. ११ वृत्तसंस्था**

नैसर्गिक आपत्तीमुळे बिहारमधील लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मुसळधार पाऊस, वादळ आणि वीज कोसळल्याने ६५ जणांचा मृत्यू झाला आहे. नालंदामध्ये सर्वाधिक २२ जणांचा मृत्यू झाला आहे. झाडे पडून, भिंती कोसळल्याने आणि त्याखाली लोक गाडल्यामुळे ३८ जणांचा मृत्यू झाला. हवामान खराब झाल्यास लोकांना बाहेर न पडण्याचे आवाहनदेखील करण्यात आले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याची घोषणा केली आहे. राज्याच्या बहुतांक भागात ४०-५० किलोमीटर प्रति तास वेगाने वारे वाहत आहेत. नालंदा येथील इस्लामपूर पोलीस स्टेशन परिसरातील बालमत बिघा गावात पूल कोसळला.

# सासूचे जावयासोबत सूत जुळले

## लेकीच्या लग्नाच्या ९ दिवस आधी पळून गेले



**अलीगड, दि. ११ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशात नात्यांचा चुराडा होईल, अशी एक घटना समोर आली आहे. एक महिला लग्नाआधीच होणाऱ्या जावयासोबत पळून गेली आहे. अलीगडच्या मडराक परिसरातील ही घटना आहे. सासू सोबत अडीच लाख रुपये घेऊन पळून गेली. याप्रकरणी नातेवाईकांना गुन्हा दाखल केला आहे.

१६ एप्रिल रोजी होणाऱ्या लग्नाच्या फक्त नऊ दिवस आधी, मुलीची आई तिच्या होणाऱ्या जावयासह पळून गेली. २ एप्रि ल रोजी लग्न ठरलेल्या मुलगा आणि मुलीचा साखरपुडा पार पडला होता. ३ एप्रिल रोजी कुटुंबियांनी जावयाला एक मोबाईल भेट दिला होता. मात्र त्यानंतर ६ एप्रिल रोजी दोघेही घरातून बेपत्ता झाले.

मीडिया रिपोर्ट्स आणि कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, लग्नानंतर लगेचच सासू आणि जावई यांच्यातील संवाद वाढू लागला. त्यानंतर दोघेही एकमेकांशी गुपचूप बोलू लागले. मुलीच्या वडिलांनी या प्रकरणावर सांगितले की, दोघे फोनवर सतत बोलत होते. त्यांतर ते अचानक गायब झाले. सोबत घरातून रोख रक्कम आणि दागिने देखील गायब झाले. दोघे अचानक पळून गेले नाही तर हे संपूर्ण प्रकरण कट रचल्यासारखे वाटते आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, ६ एप्रिल रोजी ही महिला तिच्या जावयासह पळून गेली. लग्न १६ एप्रिल २०२५ रोजी होणार होते. पळून जाताना महिलेने तिच्यासोबत अडीच लाख रुपये रोख आणि सोन्याचे दागिने नेले. याप्रकरणी पोलिस ठाण्यात बेपत्ता व्यक्तीची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलिस आता सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन ट्रेसिंग आणि कुटुंब आणि ग्रामस्थांच्या चौकशीद्वारे दोघांचा शोध घेत आहेत. पोलिसांचा असा विश्वास आहे की हे केवळ प्रेम प्रकरण नसून पूर्वनियोजित कट आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांना वेतन चिंता

**प्रवाशांच्या सोयीसाठी सर्वस्तरावरील प्रयत्न करून देखील मागील काही महिन्यात राज्य परिवहन महामंडळाची अर्थात एसटी ची अवस्था अत्यंत बिकट आहे. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातत्याने अर्थचिंता सतावते आहे. एसटी महामंडळाकडे निधीची कमतरता असल्यामुळे या महिन्यात तर कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनास विलंब झालेला आहे. एसटी महामंडळाची झालेली दशा आणि पुढील काळातील दिशा याच संदर्भात एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

**साप्ताहिक संवाद**



१]एसटी कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे वेतन विलंबाने झालेले आहे असं का?

येत्या काही दिवसात एसटी महामंडळातील प्रवासी गर्दीचा हंगाम सुरु होणार आहे. या हंगामात प्रवासी वाहतुकीचा भार वाहणाऱ्या चालक मालकांना मात्र पगाराची चिंता सतावत आहे.एसटी तील ८७ हजार कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचा निम्माच पगार एप्रिल महिन्यात जमा झालेला आहे. महामंडळाकडे निधीच नसल्याने निम्माच पगार कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला. एसटी महामंडळात झालेल्या संपानंतर राज्य सरकारने एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची जबाबदारी स्वीकारली होती. सद्य स्थितीत राज्य सरकारकडून एसटी प्रवासी प्रतिपूर्तीच्या रूपाने निधी महामंडळाला पुरवला जातो. एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी ३५० ते ३६० कोटींची आवश्यकता असते. मात्र गेल्या १० महिन्यापासून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी देखील जमा करण्यात आलेला नाही.

२]वेतन विलंब या प्रश्नावर एसटी महामंडळ कर्मचाऱ्यांची मागणी काय आहे?

निधीच्या कमतरतेमुळे एसटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडला. कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांना देखील त्याचा फटका बसला. एसटीतील ८० टक्के कर्मचाऱ्यांवर विविध कर्ज असून पगाराच्या अनियमिततेमुळे मासिक हप्त्यांवर परिणाम होतो. निम्म्या पगारात हप्ता, घरखर्च,शिक्षणाचा खर्च कसा करायचा? असे प्रश्न कर्मचाऱ्यांपुढे आहेत. ४० ते ४२ अंश तापमानात प्रवासी सेवा चालक वाहकांकडून विना तक्रार दिली जाते. यामुळे सरकारने प्राधान्याने महामंडळाला निधी उपलब्ध करून द्यावा अशी आमची मागणी आहे.

३]या प्रश्नावर कर्मचारी संघटनेची पुढील दिशा काय असणार आहे?

एसटी महामंडलच्या इतिहासात प्रथमच कर्मचाऱ्यांना निम्मा पगार देण्यात आलेला आहे. याला सरकारच जबाबदार आहे. कर्मचार्यांच्या वेतनाच्या समस्येवर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न तातडीने सोडविण्याच्या सूचना सचिवांना दिलेल्या आहेत. मार्च महिन्यातील पगारासाठी अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांची बैठक १५ एप्रिल रोजी आयोजित केली आहे. या बैठकीनंतर संघटनेची पुढील दिशा ठरणार आहे.

**लोकरंग**

## मेघालयातील जग प्रसिद्ध डॉकी तलाव



**चला पर्यटनाला**

मेघालय हे ईशान्य भारतातील सर्वात सुंदर राज्यांपैकी एक आहे. मेघालयमध्ये अनेक सुंदर पर्यटनस्थळे आहेत. येथे तुम्हाला पर्वत रांगा, उंच पठार, सुंदर धबधबे, नद्या, हिरवी कुरण तसेच नैसर्गिक सौंदर्य पाहायला मिळेल. मेघालयची राजधानी शिलाँग हे पर्यटनासाठी अतिशय लोकप्रिय ठिकाण आहे. दुसरीकडे, मेघालयचे चेरापुंजी संपूर्ण जगात सर्वाधिक पावसासाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी लाखो पर्यटक मेघालयला भेट देण्यासाठी येतात. जरी मेघालयमध्ये अनेक पर्यटन स्थळे आहेत,

मेघालयची राजधानी शिलाँग हे एक सुंदर हिल स्टेशन आहे. या हिल स्टेशनच्या आजूबाजूला हिरवाई दिसते. सुंदर धबधबे आणि उंच टेकड्या आणि सुंदर जंगलांच्या मधोमध असलेल्या या शहरात सर्व सुविधाही उपलब्ध आहेत. नैसर्गिक सौंदर्यात आरामशीर सुट्टी घालवण्यासाठी येथे येऊ शकता.मेघालयमध्ये स्थित, डॉकी तलाव त्याच्या सौंदर्यासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. या तलावाचे पाणी अगदी काचेसारखे चमकते आणि स्वच्छ आहे. पावसाळ्यात डक्की तलावाचे दृश्य अधिकच सुंदर होते. पावसाळ्यात उमंग टोक नदीवर बोट शर्यतीचे आयोजन केले जाते, त्यात सहभागी होऊन मन प्रसन्न होते.चेरापुंजी जगातील सर्वाधिक पाऊस पडण्यासाठी प्रसिद्ध आहे. तसेच हे ठिकाण खूप हिरवेगार आणि सुंदर आहे, जिथे अनेक धबधबे आहेत. निसर्गप्रेमींसाठी हे ठिकाण योग्य आहे. चेरापुंजीला झाडांच्या मुळापासून विकसित नैसर्गिक पूल आहेत, तसेच डवकी, नोहकालिकाई, मवस्माई गुहा ही चेरापुंजीची प्रमुख पर्यटन स्थळे आहेत. मेघालयला गेले तर मौसिनराम सहलीला जाऊ शकतात. पावसाळ्याचा आनंद लुटण्यासाठी इथे येऊ शकता. मावलिनांग हे भारतातील सर्वात सुंदर आणि स्वच्छ गाव आहे. पावसाळ्यात तुम्ही मौसिनरामला भेट देऊ शकता.

## मुंग्यांचे मनोरंजक विश्व

**वेध प्राणीविश्वाचा**



मुंग्या हा कीटक आपल्या चांगलाच परिचयाचा आहे. उन्हाळ्यात, पावसाळ्यात या मुंग्यांच्या झुंडीच्या झुंडी घराघरातून दिसतात. मुंग्या एका ठिकाणी साठविलेले अन्न दुसरीकडे नेताना पाहिल्या की हमखास पाऊस येणार असा होरा बांधला जातो व तो खराही आहे. तोंडात कसला ना कसला अन्नाचा कण, मेलेली झुरळे, बारीक किडे धरून कुठेही न थांबता व न थकता सतत धावपळ करणाऱ्या मुंग्या तसा कुतुहलाचा विषय आहे. मात्र आपल्याला या मुंग्याविषयी फारच थोडी माहिती असते. मुंग्यांचे विश्व फारच मनोरंजक आहे ते थोडक्यात जाणून घेऊ या.जगात १२ हजार प्रकारच्या मुंग्या आहेत. आपण नेहमी लाल व काळ्या रंगाच्या मुंग्या पाहतो पण हिरव्या रंगाच्या मुंग्याही असतात. मुंगी दिसते एवढीशी पण तिच्या वजनाच्या २० पट अधिक वजन ती वाहून नेऊ शकते.मुंग्यांमध्ये एक राणी मुंगी असते तिला पंख असतात. राणी मुंगी लाखो अंडी घालते. मुंग्यांचे सरासरी आयुष्य २८ वर्षांचे असते तर राणी मुंगीचे आयुष्य सरासरी ३० वर्षांचे असते.मुंग्यांना कान नसतात. जमिनीच्या कंपनांवरून त्या अंदाज घेतात. मुंग्या एकमेकींशी लढल्या तर ही लढाई आर या पार होते. म्हणजे कुणा एकाचा मृत्यू होईपर्यंत ती थांबत नाही.मुंग्या एकाच रांगेत चालतात. कारण त्यांच्यामधून एक प्रकारचा पातळ पदार्थ बाहेर पडतो व त्याचा वेध घेऊनच मागच्या मुंग्या चालतात. मेलेल्या मुंगीच्या शरीरातून एक प्रकारचे रसायन पाझरते त्यावरून बाकी मुंग्या ती मेल्याचे जाणतात. विशेष म्हणजे हे रसायन जिवंत मुंगीच्या अंगावर टाकले तरी बाकीच्या मुंग्या ती मेली असेच मानतात.अन्नाची साठवण फक्त माणूस व मुंग्याच करतात.पृथ्वीवरील माणसांचे एकत्र जेवढे वजन होईल तेवढ्याच वजनाच्या मुंग्या पृथ्वीवर आहेत. डायनोसोरच्या काळातही मुंग्या होत्याच. आता बोला!

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# 4 कोटींच्या कारसाठी 46 लाखांची नंबर प्लेट

**तिरुवनंतपुरम, दि. ११ वृत्तसंस्था**

केरळमधील लिटमस ७ सिस्टम्स कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे सीईओ आणि संस्थापक वेणू गोपालकृष्णन यांनी राज्यातील सर्वात महागडा वाहन नोंदणी क्रमांक खरेदी केला आहे. यानंतर गोपालकृष्णन हे चांगलेच चर्चेत आल्याचे पाहायला मिळत आहेत. मोटार वाहन विभागाने आयोजित केलेल्या ऑनलाइन लिलावात त्यांनी ४५.९९ लाख रुपये देऊन त्यांच्या अंदाजे ४ कोटी रुपये किमतीच्या लक्झरी लॅम्बोर्गिनी उरुस परफॉर्मंट कारसाठी 'KL 07 DG 0007' हा नंबर विकत घेतला आहे.

हा लिलाव ७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये हा क्रमांक मिळवण्यासाठी जोरदार चढाओढ लागल्याचे पाहायला मिळाले. या क्रमांकासाठी ५ जणांनी २५ हजार रुपयांपासून बोलीला सुरूवात केली. अखेर या लिलावात शेवटी दोन जण शिल्लक राहिले, मात्र हा क्रमांक मिळवण्यासाठी गोपालकृष्णन यांनी अखेरची बोली लावली आणि त्यांनी हा क्रमांक मिळवला. त्यांनी थोड्याशा फरकाने ४४.८४ लाख रुपयांच्या दुसऱ्या क्रमांकाच्या बोलीला मागे टाकले.

# बळी देण्यासाठी जाणाऱ्या कुटुंबाची कार कोरड्या नदीत कोसळली ; 4 जणांचा जागीच मृत्यू, बोकड वाचले

**जबलपूर, दि. ११ वृत्तसंस्था**

मध्य प्रदेशातूनअपघाताची विचित्र घटना समोर आली आहे. मध्य प्रदेशच्या जबलपूरमध्ये बोकडाचा बळी देण्यासाठी निघालेल्या एका कुटुंबाच्या गाडीचा भीषण अपघात झाला. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे ज्या बोकडाचा मंदिरात बळी देण्यासाठी नेत होते ते या अपघातातून बचावले आहे. एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याने नातेवाईकांवर शोककळा पसरली आहे.




गुरुवारी मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये एका भरधाव वेगाने येणाऱ्या कारचे नियंत्रण सुटले आणि ती पुलाची रेलिंग तोडून थेट नदीत पडली. एका भरधाव वेगाने येणाऱ्या एसयूव्हीने पुलाचे रेलिंग तोडले आणि ती ३० फूट खोल जाऊन कोरड्या नदीत पडली. या भीषण अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला, तर २ जण गंभीर जखमी झाले. पूजेनंतर कुटुंबिय बोकडाचा बळी देण्यासाठी जात होते. त्याचदरम्यान हा अपघात घडला. अपघातात बोकडाचा जीव वाचला आहे. या धक्कादायक घटनेची सर्वत्र चर्चा सुरु झाली आहे.

पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत आणि जखमींच्या बरे होण्याची वाट पाहत आहेत जेणेकरून नेमकं काय घडलं याची माहिती मिळू शकेल. "काल दुपारी ३-४ वाजता, चारगव्हाण पोलिस स्टेशन परिसरात एका वाहनाचे नियंत्रण सुटून पुलावरून पडल्याने ४ जणांचा मृत्यू झाला. २ जण जखमी झाले आहेत. हे लोक मंदिरातून परतत होते," अशी माहिती चारगव्हाण पोलीस ठाण्याचे प्रभारी अभिषेक प्यासी यांनी दिली.

जबलपूर जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ३० किमी अंतरावर असलेल्या चारगव्हाण-जबलपूर रस्त्यावर हा अपघात झाला. गाडीत पटेल कुटुंबातील ६ सदस्य होते, जे नरसिंहपूर येथील दादा दरबारात दर्शन करुन बोकडाचा आणि कोंबड्याचा बळी देण्यासाठी जबलपूरला परतत होते. घरी आल्यानंतर कुटुंबिय मटणाची मेजवानी देणार होते. मात्र त्याआधीच अपघाताची भीषण घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वेग जास्त असल्याने चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर एसयूव्ही रेलिंग तोडून कोरड्या नदीत पडली. अपघाताची माहिती मिळताच, चारगव्हाण पोलीस घटनास्थळी पोहोचले. स्थानिकांनी मोठा आवाज एकल्यानंतर पोलिसांना या घटनेची माहिती दिली होती. गाडी खाली पडल्यामुळे तिचा चेंदामेंदा झाला होता. त्यामुळे जखमी आणि मृतदेह बाहेर काढण्यात अनेक अडचणी येत होत्या.





# मुकेश कुमारचा नवा विक्रम

**बंगळुरू, दि. ११ वृत्तसंस्था**

आरसीबी आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात गुरुवारी (दि.२०) एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सामना झाला. या सामन्यामध्ये दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेल याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, सामन्याच्या सुरुवातीलाच हा निर्णय त्यांच्यासाठी अनुकूल असा ठरला नाही. कारण आरसीबीने आक्रमक सुरुवात करत सर्वात जलद अर्धशतक झळकावले.

सलामीवीर विराट कोहली आणि फिल साल्ट यांनी अवघ्या तीन षटकांत ५० धावांची भागीदारी करत सामना आपल्या बाजून वळवला. तथापि, त्यानंतर फिल साल्ट धावबाद झाला. दरम्यान, डीसीकडून या हंगामात आपला पहिला सामना खेळणाऱ्या मुकेश कुमारने पहिल्याच षटकात आपल्या गोलंदाजीचे कौशल्य दाखवत चाहत्यांची मने जिंकली. मुकेश कुमारने सातव्या षटकात गोलंदाजी करताना देवदत्त पडिकलला बाद केले. विशेष म्हणजे, हे षटक निर्धाव होते. त्यात विकेटही मिळाली. यासह मुकेश आयपीएल २०२५ मध्ये विकेट मेडन टाकणारा तिसरा गोलंदाज ठरला आहे.

**२०२५ हंगामात निर्धाव षटक टाकणारे गोलंदाज**

जोफ्रा आर्चर – विरुद्ध सीएसके
वैभव अरोरा – विरुद्ध एसआरएच
मुकेश कुमार – विरुद्ध आरसीबी

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com